POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकारी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-२४१ ● मुंबई, शनिवार, ०४ एप्रिल २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## एप्रिलमध्ये राज्यात कोसळधारा!

### पुण्यात विक्रमी पाऊस, नाशिकमध्ये गारपीट, तर विदर्भात दाणादाण

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

ऐन एप्रिल महिन्यात पुण्यासह नाशिक आणि विदर्भात कोसळलेल्या पावसाने दाणादाण उडवली. पुणे शहरात गुरुवारी दुपारी सुमारे दोन तास वादळीवारे, विजांचा कडकडाट आणि ढगांच्या गडगडाटासह मुसळधार पावसाने हजेरी लावली. या पावसाने एप्रिल महिन्यातील पावसाचा १३० वर्षांचा विक्रम मोडला. .

पुणे शहरात सलग दोन तास बरसलेल्या वादळी पावसामुळे मध्यवर्ती पुण्यासह उपनगरांतील अनेक रस्ते जलमय झाले होते. दुपारी २ ते ४ या वेळेत शिवाजीनगर येथे ६५ मिमी, तर एनडीए परिसरात ८४ मिमी पावसाची नोंद झाली. यापूर्वी ४ एप्रिल १८९६ रोजी पुणे शहरात ५१.१ मिमी पावसाची नोंद झाली होती. उन्हाच्या तीव्र झळांनी हैराण झालेल्या पुणेकरांनी एकाच आठवड्यात तिसऱ्यांदा जोरदार पावसाचा सामना केला. भारतीय हवामानशास्त्र विभागाने दिलेल्या इशाऱ्यानुसार, दुपारी १नंतर आकाशात ढग दाटून आले. तासाभरात गडद ढगांमुळे अंधार पडल्यासारखे वातावरण झाले होते.




२च्या सुमारास वारा सुटला, ढगांचा गडगडाट सुरू झाला आणि पावसाच्या सरीही बरसल्या. विजांच्या कडकडाटाबरोबर पावसाचा जोरही वाढत गेला आणि सुमारे दोन तास पुणे, पिंपरी-चिंचवड आणि जिल्ह्यात मुसळधार बरसला. सोसाट्याच्या वाऱ्यांमुळे अनेक ठिकाणी झाडे पडली. संध्याकाळी ५नंतर पाऊस थांबला. तरीही हवेतील गारवा कायम होता. मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले शिवाय शेतकऱ्यांच्या शेतीचे मोठे नुकसान झाले.

नाशिकमध्ये गेले काही दिवस सातत्याने ग्रामीण भागाला झोडपून काढणाऱ्या अवकाळी पावसाने गुरुवारी सायंकाळी शहरात दाणादाण उडवून दिली. म्हसरूळसह शहराच्या काही भागांत गारपीट आणि जोरदार सरींनी हजेरी लावली. शहरात ठिकठिकाणी खोदकामे सुरू असल्याने रस्त्यांवर पाण्याची तळी आणि चिखल होऊन नागरिकांची तारांबळ उडाली. दरम्यान, हवामान विभागाने आज, शुक्रवारी पावसाचा यलो अलर्ट दिला आहे. नंदुरबार शहरासह तालुक्यात गुरुवारी दुपारी अवकाळी पाऊस व गारपीटीने सुमारे ४५ मिनिटे जोरदार हजेरी लावल्याने शेतकरी व व्यवसायिकांची धावपळ उडाली.

विदभार्तील नागपूर, वर्धा, गडचिरोली, अमरावती, बुलढाणा जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटात पावसाच्या दमदार सरी कोसळल्याने अनेक घरांचे नुकसान झाले. शेतातील कापणीला आलेला गहू मातीमोल झाला. बाजार समित्यांमध्ये ठेवलेला माल भिजल्याने मोठे नुकसान झाले आहे. मराठवाड्याच्या विविध जिल्ह्यांत गुरुवारीही अवकाळीने हजेरी लावली. दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसाने पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

> "पुढील दोन दिवस तापमानात थोडी वाढ होणार असून, दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ राहील. दुपारनंतर मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह हलक्या स्वरूपाचा पाऊस पडणार असल्याची शक्यता आहे."
>
> **-एस. डी. सानप, हवामान शास्त्रज्ञ, भारतीय हवामानशास्त्र विभाग**

### पुन्हा धो धो बरसणार पाऊस

**■मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यात सध्या अवकाळी पावसानं थैमान घातलं आहे. वातावरणाची परिस्थिती पाहता, हवामान विभागाने काही ठिकाणी पावसाचा यलो अलर्ट जारी केलाय. यामुळे राज्यात सध्या काही ठिकाणी उष्ण - दमट, तर काही ठिकाणी ढगाळ वातावरणाची शक्यता आहे. जाणून घेऊयात 3 मार्च 2026 रोजी राज्यातील एकूण हवामान विभागाचा अंदाज.

- **कोकण** : कोकण विभागातील पालघर, ठाणे, मुंबईमध्ये हवामान विभागाने हलक्या पावसाचा अलर्ट जारी केला. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांत हवामान विभागाने विजांच्या कडरडाटासह हलक्या पावसाचा अलर्ट जारी केला.
- **मध्य महाराष्ट्र** : मध्य महाराष्ट्रातील धुळे, नाशिक, पुणे आणि सोलापूर या जिल्ह्यांत हवामान विभागाने पावसाचा यलो अलर्ट जारी केला. नंदुरबार, कोल्हापूर, सातारा आणि सांगली या जिल्ह्यात हवामान विभागाने विजांसह पावसाचा अलर्ट जारी केला. अहिल्यानगर, जळगाव या दोन जिल्ह्यांत हवामान विभागाने पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी केला.
- **मराठवाडा** : मराठवाडा विभागात छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली तसेच नांदेड, लातूर, धाराशिव, अकोला, अमरावती या जिल्ह्यांत हवामान विभागाचा यलो अलर्ट जारी केला.
- **विदर्भ** : विदर्भातील बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ या जिल्ह्यांत हवामान विभागाने पावसाचा यलो अलर्ट जारी केला. वाशिम, वर्धा, नागपूर, गोंदिया, भंडारा या जिल्ह्यात हवामान विभागाने कसलाही अंदाज जारी केला नाही.

## कोकणची झेप

### मुख्यमंत्री रोजगार योजनेत 111% उद्दिष्टपूर्ती 16,000 युवकांना रोजगार



**■नवी मुंबई। प्रतिनिधी,**

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP) योजनेत कोकण विभागाने यंदा उल्लेखनीय कामगिरी करत 111.57 टक्के उद्दिष्टपूर्ती साध्य केली आहे. या योजनेअंतर्गत एकूण 3 हजार 749 उद्योजकांना कर्ज मंजूर करण्यात आले असून, त्यातून सुमारे 16 हजारांहून अधिक युवकांना रोजगार उपलब्ध होणार आहे.

चालू आर्थिक वर्षात कोकण विभागाला 4,452 प्रकरणांचे उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यापैकी जिल्हा उद्योग केंद्र (DIC) यंत्रणेसाठी 2,671 तर खादी व ग्रामोद्योग मंडळासाठी 1,781 प्रकरणांचे उद्दिष्ट होते. प्रत्यक्षात मात्र 3,749 कर्जप्रकरणे मंजूर झाली असून, यात सुमारे 84 कोटी रुपयांच्या अनुदानाचा समावेश आहे. विशेष म्हणजे, कोकण विभागाने सलग तिसऱ्यांदा 100 टक्क्यांहून अधिक उद्दिष्टपूर्ती करत आपली आघाडी कायम राखली आहे.

जिल्हानिहाय कामगिरीत रत्नागिरी जिल्ह्याने 130.64 टक्के उद्दिष्टपूर्ती करून अव्वल स्थान पटकावले आहे. त्याखालोखाल रायगड जिल्ह्याने 100.50 टक्के, सिंधुदुर्गने 123.33 टक्के आणि पालघरने 103.30 टक्के उद्दिष्ट पूर्ण केले आहे. ठाणे जिल्ह्यानेही 61.65 टक्के कामगिरी नोंदवत विभागाच्या एकूण यशात आपला सहभाग नोंदविला आहे.

मंजूर प्रकल्पांमध्ये 914 उत्पादन क्षेत्रातील तर 2 हजार 835 सेवा क्षेत्रातील प्रकल्पांचा समावेश असून, यातील सुमारे 50 टक्के लाभार्थी महिला व मागासवर्गीय घटकांतील आहेत. यामुळे सामाजिक समावेशकतेलाही चालना मिळाली आहे.

अनुदान वितरणात कोकण विभागाने 935 प्रकरणांद्वारे (21 टक्के) राज्यात तिसरा क्रमांक मिळविला आहे. तसेच रत्नागिरी जिल्ह्याने 73.72 टक्के मार्जिन मनी दावे सादर करून विशेष कामगिरी बजावली आहे.

या यशामागे विकास आयुक्त (उद्योग) दिपेंद्रसिंह कुशवाह यांचे नेतृत्व तसेच रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर व ठाणे येथील जिल्हाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन लाभले आहे. उद्योग सहसंचालक विजू सिरसाठ यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा उद्योग केंद्रांचे अधिकारी, बँक अधिकारी आणि संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम केल्यामुळे ही कामगिरी शक्य झाली आहे.

योजनेची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक व सुलभ व्हावी यासाठी mah-cmegp.gov.in हे ऑनलाइन पोर्टल कार्यान्वित करण्यात आले आहे. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील अधिकाधिक युवकांनी पुढे येऊन उद्योग उभारावेत आणि स्वावलंबी व्हावे, असे आवाहन उद्योग सहसंचालकांनी केले आहे.

दरम्यान, कोकण विभागाने विविध उद्योग प्रोत्साहन उपक्रम, निर्यात परिषद, 'महाराष्ट्र इग्नाईट', 'एक्सपोर्ट कॉन्क्लेव्ह' आदी कार्यक्रमांच्या माध्यमातून युवकांना उद्योगक्षेत्राकडे वळविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.

## कुठे सिलेंडरसाठी रात्रभर पहारा तर कुठे साखळदंडाने बांधले सिलेंडर

### महाराष्ट्रात गॅस टंचाईचा भडका, कुठे काय स्थिती?



**■मुंबई। प्रतिनिधी,**

सध्या जागतिक स्तरावर अमेरिका, इराण आणि इस्रायल यांच्यातील तणाव दिवसेंदिवस वाढू लागला आहे. या वाढत्या तणावाचे थेट परिणाम आता महाराष्ट्रातील सर्वसामान्यांच्या स्वयंपाकघरात दिसू लागले आहेत. मुंबई, नागपूर, अमरावती आणि जळगाव यांसारख्या प्रमुख शहरांमध्ये एलपीजी गॅस सिलेंडरचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे नागरिक संतप्त होऊन रस्त्यावर उतरले आहेत.

**मुंबईच्या मालवणीत गॅससाठी रात्रीचा पहारा**

मुंबईतील मालाडमधील मालवणी हा अत्यंत दाट वस्तीचा परिसर सध्या गॅस टंचाईचा केंद्रबिंदू ठरला आहे. गॅस एजन्सीबाहेर लागलेल्या लांबच लांब रांगेत आपले सिलिंडर चोरीला जाऊ नयेत किंवा कुणी रांगेतील क्रम बदलू नये, यासाठी नागरिकांनी साखळदंडाने ४-५ सिलिंडर एकत्र बांधून त्यांना कुलूप लावले आहे. अनेक नागरिक रात्री १० वाजेपासूनच रस्त्यावर रांगा लावून बसत आहेत. यात महिलांची संख्या मोठी असून, घरकाम आणि मजुरी सोडून त्यांना भर उन्हात उभे राहावे लागत आहे.

या पार्श्वभूमीवर काल संतप्त मालवणीकरांनी गेट नंबर १ वर रस्ता रोको करत वाहतूक रोखून धरली होती. बुकिंग होऊनही गॅस मिळत नाही आणि विचारणा केल्यावर उडवाउडवीची उत्तरे मिळतात, असा आरोप आंदोलकांनी केला आहे.

**छत्रपती संभाजीनगरमध्ये टंचाईच्या काळात गॅसची काळाबाजारी**

एकीकडे जनता गॅससाठी रस्त्यावर उतरली असताना, दुसरीकडे गॅस चोरीचे मोठे रॅकेट उघडकीस आले आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये दक्षता पथकाने मोठी कारवाई केली आहे. राज्यस्तरीय दक्षता पथकाने गंगापूर तालुक्यातील वैजापूर रोडवरील खोजेवाडी शिवारात धाड टाकली. यावेळी एका हॉटेलच्या मागे टँकरचे सील तोडून गॅस चोरी केली जात होती. पोलिसांनी ३५,२२० किलो एलपीजी गॅससह दोन मोठे कॅप्सूल टँकर जप्त केले आहेत. या मुद्देमालाची किंमत १ कोटी २६ लाख रुपये आहे. यामुळे हजारो कुटुंबांचे नुकसान झाले आहे. जप्त केलेल्या गॅसमुळे किमान २४८० कुटुंबांची महिन्याची चूल पेटली असती, इतका हा साठा मोठा होता.

**नागपूर आणि अमरावतीत गॅस पुरवठा विस्कळीत**

नागपुरात सलग १७ ते १८ दिवसांपासून अनेक भागांत गॅस पुरवठा विस्कळीत आहे. ऑनलाईन बुकिंग यंत्रणा कोलमडली असून नो स्टॉकचे बोर्ड एजन्सीबाहेर पाहायला मिळत आहेत. इराण-इस्त्रायल युद्धाचा परिणाम म्हणून आयातीवर परिणाम झाल्याचे स्थानिक वितरकांचे म्हणणे आहे. तसेच अमरावतीच्या अंबादेवी मंदिर परिसरातील भारत गॅस एजन्सीसमोर ग्राहकांच्या रांगा कमी होण्याचे नाव घेत नाहीत. एजन्सीने केवळ होम डिलिव्हरी मिळेल असे बोर्ड लावले असले, तरी अनेक दिवस वाट पाहूनही गॅस घरी येत नसल्याने नागरिक स्वतः एजन्सीवर गर्दी करत आहेत.

**सर्वांना गॅस देण्याचे आश्वासन**

जळगावच्या जामनेरमध्ये समर्थ गॅस एजन्सीच्या कारभाराविरोधात नागरिकांनी जामनेर-छत्रपती संभाजीनगर महामार्ग दीड तास रोखून धरला. एजन्सीकडून फोन आल्यावर नागरिक पहाटेपासून रांगेत उभे राहिले, पण सकाळी ११ वाजता स्टॉक संपला असे सांगण्यात आल्याने नागरिकांचा संयम सुटला. अखेर पोलीस आणि पुरवठा अधिकाऱ्यांनी मध्यस्थी करून सर्वांना गॅस देण्याचे आश्वासन दिल्यावर आंदोलन मागे घेण्यात आले. सध्याच्या गॅस टंचाईमागे प्रामुख्याने दोन कारणे सांगितली जात आहेत. इराण आणि इस्त्रायलमधील संघषार्मुळे कच्च्या तेलाच्या आणि गॅसच्या पुरवठा साखळीवर परिणाम झाला आहे. तर अनेक ठिकाणी गॅस असूनही त्याची काळाबाजारी किंवा साठेबाजी केली जात असल्याची शंका नागरिक व्यक्त करत आहेत.

## चालकाची मस्ती प्रवाशांच्या जीवावर

### 38 जखमी, 2 प्रवाशांचा जागीच अंत

**■बीड। प्रतिनिधी,**

मुंबई-गोवा महामार्गावर पुन्हा एकदा भीषण अपघात झाला आहे. नागोठणे जवळील सुकळी खिंडीत शुक्रवारी पहाटे एका खाजगी बसला भीषण अपघात झाला. या भीषण अपघातात दोन प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात ३८ प्रवासी जखमी झाले असून त्यातील १० जणांची प्रकृती चिंताजनक आहे. विशेष म्हणजे, हा अपघात तांत्रिक बिघाडामुळे नसून चालकाच्या बेजबाबदारपणामुळे झाल्याचा खळबळजनक आरोप प्रवाशांनी केला आहे. मुंबईहून गोव्याच्या दिशेने जाणारी ही खाजगी लक्झरी बस सुकळी खिंडीतून जात असताना पहाटेच्या सुमारास हा अपघात झाला. खिंडीतील तीव्र वळणावर चालकाचा वेगावरचा ताबा सुटला आणि बस थेट उलटली. बस उलटताच प्रवाशांमध्ये एकच आक्रोश आणि गोंधळ निर्माण झाला. अपघाताचा आवाज इतका मोठा होता की स्थानिक ग्रामस्थांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली. या अपघातातून बचावलेल्या प्रवाशांनी चालकाच्या वर्तणुकीवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. प्रवाशांच्या म्हणण्यानुसार, प्रवास सुरू झाल्यापासूनच चालक अतिशय वेगाने आणि नागमोडी पद्धतीने बस चालवत होता. अनेक प्रवाशांनी त्याला टोकले, तरीही त्याने दुर्लक्ष केले. धक्कादायक बाब म्हणजे, काही प्रवाशांनी बस धावत असतानाच फीइ४२ या पोर्टलवर चालकाच्या बेदरकार ड्रायव्हिंगबाबत ऑनलाईन तक्रारही नोंदवली होती. दुदैर्वाने, या तक्रारीची दखल घेण्यापूर्वीच हा भीषण अपघात घडला. या अपघातानंतर नागोठणे पोलीस आणि स्थानिक रेस्क्यू टीमने जखमींना बसमधून बाहेर काढले. जखमींना सुरुवातीला स्थानिक रुग्णालयात नेण्यात आले, मात्र गंभीर जखमी असलेल्या ९ ते १० प्रवाशांना तातडीने कळंबोली येथील एमजीएम रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

## सुनेला रात्री 12 वाजता विधीसाठी केली जबरदस्ती

### सर्वच पुरुष नग्नावस्थेत, सासऱ्याने तिच्या उघड्या अंगावर...

**■मुंबई। प्रतिनिधी,**

सुनेला रात्री 12 वाजता एका विधीसाठी जबरदस्ती केली, त्याचक्षणी कुटुंबातील सर्वच सदस्य हे नग्नवस्थेत होते. एवढंच नाहीतर कुटुंबियांनी सुनेला देखील तसे करण्यास भाग पाडले होते. दरम्यान, युपी तक या डिजीटल वृत्त माध्यमाने सुनेशी संवाद साधला असता, तिने त्या रात्री घडलेला धक्कादायक प्रकार सांगितला.

**फॉर्च्युनर कारसह लग्नात भरघोस हुंडा दिला तरी सासरचे नाराज**

पीडितेनं सांगितलं की, तिच्या वडिलांनी गंगा व्हॅलीसारखे महागडे ठिकाण आणि फॉर्च्युनर कारसह लग्नात भरघोस हुंडा दिला होता. एवढं सर्व करूनही सासरचे लोक तिच्यावर असमाधान व्यक्त करत होते. त्यांनी घराची मागणी केली होती, पीडितेनं आरोप केला की, कार तिच्या नावावर असल्याने तिचा छळ करण्यात आला. महिलेच्या म्हणण्यांनुसार, विवाहानंतर जेव्हा तरुणी सून म्हणून घरी आली, तेव्हा तिच्या सासूने तिला रात्री 12 वाजता उठवले.

**सुनेच्या शरीरावर राख लावली**

संबंधित प्रकरणात पीडित महिलेचा आरोप की, तिच्या पतीने तिला आतमध्ये जाण्यास सांगितले होते. त्याचवेळी कोणात्याच व्यक्तीच्याही अंगावर कपडेच नव्हते. हा प्रकार तिच्यासाठी विचित्र आणि भीतीदायक होते. तिला जबरदस्तीने तिच्या सासऱ्यांच्या खोलीत पाठवण्यात आले. नंतर सासऱ्यांनी आपल्या सुनेच्या शरीराला राख लावली.

संबंधित प्रकरणात पीडितेचा आरोप असा की, ती गेल्या 15 महिन्यांपासून तिच्या माहेरी घरात राहत होती. पोलीस तक्रार दाखल करून हे प्रकरण दडपण्यात आले. पीडितेच्या म्हणण्यांनुसार, तिच्या सासरच्या मंडळींनी तिला धमकावले की, माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे कुटुंब आणि माजी आयएएस अधिकारी अवनीश अवस्थी यांच्यासारख्या प्रभावशाली लोकांशी त्यांचे संबंध आहेत, कोणीही काहीही वाकडं करू शकणार नाही.

**विधीदरम्यान घरातील पुरुष कपडे काढून नग्न झाले**

नंतर तांत्रिक विधी केला, पण त्या विधीदरम्यान जे काही घडले, ज्यामुळे ती पूर्णपणे खचून गेली होती. संबंधित प्रकरणात असा आरोप की, कार तिच्या नावावर असल्याने तिचा छळ करण्यात आला. महिलेच्या म्हणण्यांनुसार, विवाहानंतर जेव्हा ती सून म्हणून घरी परतली तेव्हा तिच्या सासूने तिला रात्री 12 वाजता उठवले, नंतर एक तांत्रिक विधी करण्यात आला, त्या विधीदरम्यान जे काही घडलं, त्यामुळे ती पूर्णपणे खचून गेली. संबंधित प्रकरणात आरोप असा की, विधीदरम्यान घरातील पुरुष कपडे काढून नग्न झाले. त्याचक्षणी पतीने देखील तिचे कपडे काढले, नंतर तांत्रिक विधीसाठी सर्वजन नग्नवस्थेत बसले.

## मुंब्र्यात छेडछाडीच्या वादातून तिघांवर गोळीबार... एकाचा मृत्यू, दोघे जखमी

**■ठाणे। प्रतिनिधी,**

मुंब्र्यात छेडछाडीच्या वादातून एका व्यक्तीने तिघांवर गोळ्या झाडल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेत एकाचा मृत्यू झाला असून दोघे जखमी झाले आहेत. गुरुवारी सकाळी कैलासनगर परिसरात ही घटना घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंब्रा येथील कैलासनगर भागातील सुमनताई चव्हाण हिंदी प्राथमिक विद्यालयाजवळील बिस्मिल्ला चाळीत ही घटना घडली. जयन शिवानंदन नायर (५१) याच्या मानलेल्या बहिणीची काही जणांनी छेड काढल्याचा आरोप आहे. या कारणावरून संबंधितांमध्ये आधी वाद झाला होता. हा वाद चिघळल्यानंतर जयनने संतापाच्या भरात तिघांवर गोळीबार केला.



या गोळीबारात अब्दुल हसन शेख, अकबर अब्दुल शेख आणि समीर अहमद शेख हे तिघे गंभीर जखमी झाले. घटनेनंतर आरोपी जयन घटनास्थळावरून पसार झाला होता. मात्र, मुंब्रा पोलिसांनी आरोपीचा शोध घेत त्याला अटक केली. त्याच्याकडून गुन्ह्यात वापरलेले हत्यारही जप्त करण्यात आले आहे. जखमींना रुग्णालयात दाखल केले. उपचारादरम्यान अकबर अब्दुल शेख यांचा मृत्यू झाला, तर उर्वरित दोघांवर उपचार सुरू आहेत.

या भागातील परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिसांनी बंदोबस्त वाढवला. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला असून पुढील तपास मुंब्रा पोलीस करत आहेत.



## डोंबिवलीत पुजाऱ्याचं विकृत कृत्य...

### घरात कोणीही नसताना 5 वर्षांच्या चिमुरडीवर लैंगिक अत्याचार

**■डोंबिवली। प्रतिनिधी,**

डोंबिवलीतील गोग्रासवाडी परिसरात एका पाच वर्षांच्या चिमुरडीवर एका पाच वर्षांच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार केला. या धक्कादायक घटनेनं परिसर हादरून गेला आहे. या प्रकरणी टिळकनगर पोलिसांनी पुजारी हरीश भावे या आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहेत. अशोक खरात या भोंदूबाबामुळे आता अशा घटना समोर येऊ लागल्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी हरीश भावे हा ग्रोग्रासवाडी परिसरात घरोघरी जाऊन पूजा-अर्चना केली. पीडित मुलीचे आई-वडील हे मजुरीसाठी दिवसभर घराबाहेरच असतात. संबंधित परिस्थितीचा फायदा घेत आरोपीने निष्पाप मुलीवर अत्याचाराचा प्रयत्न केला. आरोपी हा पीडित कुटुंबाच्या घराशेजारी राहत असल्याने त्याचे घरात सतत ये-जा सुरु असायचे. ओळखीचा गैरफायदा घेत नराधमाने 15 मार्च ते 1 एप्रिल महिन्यादरम्यान वारंवार हे कृत्य केल्याचे समोर आले.



**पीडितेनं कुटुंबियांना सांगितला घटनेचा थरार**

दरम्यान, चिमुरडीने धैर्य दाखवत तिच्यासोबत घडलेला प्रकार सांगितला. घटनेची बाब समजताच पालकांना मोठा धक्का बसला, नंतर त्यांनी तात्काळपणे टिळकनगर पोलीस ठाणे गाठत तक्रार दाखल केली. पोलिसांनी घटनेचं गांभीर्य ओळखून भारतीय न्यायसंहिता 74, 76 कलमान्वये पॉक्सो 2012 कायद्यांतर्गत कलम 8 व 12 नुसार, गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेनं परिसर हादरून गेले आहे. संबंधित प्रकरणात आरोपीला कठोर शिक्षा व्हावी, अशी नागरिकांकडून मागणी करण्यात आली आहे.




संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# कालसुसंगत दिलासा




**काही ठिकाणी रेडीरेकनरच्या दरांपेक्षा प्रत्यक्षातील बाजारभाव कमी असल्याचा विरोधाभास दिसून येतो. या दरांत वाढ झाल्याने ही विसंगती आणखी ठळक झाली असती. अर्थव्यवस्था सावरत असताना युद्धाचे संकट उद्भवले असून बांधकामासह विविध क्षेत्रांना त्याचे फटके बसू लागले आहेत.**

घर किंवा मोकळी जागा खरेदी करण्यासाठी लागू करण्यात येणाऱ्या वार्षिक बाजारमूल्याचे (रेडीरेकनर) दर स्थिर ठेवण्याचा राज्य सरकारचा निर्णय कालसुसंगत आणि व्यावहारिक आहे. नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभागाकडून यंदाच्या रेड रेकनरच्या दरात पाच ते आठ टक्के वाढीचा प्रस्ताव सुचवण्यात आला होता; मात्र बाजारातील परिस्थिती पाहता रेडी रेकनरच्या दरांमध्ये वाढ करू नये, अशी बांधकाम व्यावसायिकांची मागणी होती. युद्धजन्य परिस्थितीमुळे अर्थव्यवस्थेवर होऊ घातलेल्या परिणामांचा विचार करून राज्य सरकारने या दरांमध्ये वाढ न करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे एकीकडे गृहबांधणी उद्योग आणि दुसरीकडे ग्राहकांनाही दिलासा मिळाला आहे. विशेषतः गेल्या दोन वर्षांत निवडणूक काळात अशा सवलती अपेक्षित होत्या; मात्र आता सगळ्या निवडणुका पार पडल्यानंतर महसुलावर पाणी सोडण्यास सहसा तयार नसणाऱ्या सरकारने हा निर्णय घेतला, याचा अर्थ ती बाजाराची निकड आहे, असे म्हणावे लागेल. करोनाच्या साथीमुळे भारतासह जगाच्या अर्थव्यवस्थेला फटका बसला होता. रोजगार बुडाल्यामुळे आवश्यक तेवढाच खर्च करण्याशिवाय अनेकांपुढे पर्याय नव्हता. साहजिकच घरखरेदीसारख्या खर्चाबाबत ग्राहकांनी हात आखडता घेतला; तर अनेकांना नव्या घरखरेदीचा विचारही सोडून द्यावा लागला होता. गृहबांधणी हा प्रचंड प्रमाणात रोजगार उपलब्ध करून देणारा उद्योग असल्याने या क्षेत्राची चाके फिरती राहण्यासाठी सरकारनेही विविध उपाययोजना केल्या. गेल्या काही वर्षांत रेडीरेकनरच्या दरांत माफक वाढ करण्यात आली. राज्यातील प्रमुख शहरांमध्ये आधीच घरांचे दर गगनाला भिडले आहेत. सरकारच्या धोरणांमुळे चटईक्षेत्र मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाले असले, तरी जमिनींना सोन्याचे दर आले आहेत. त्यातच बांधकाम साहित्याच्या दरांतही सातत्याने वाढ होत आहे. याबरोबरच केंद्र-राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे विविध कर-उपकर यांचाही त्यात मोठा वाटा आहे. या सर्वांचा बोजा अंतिमतः ग्राहकांवरच पडतो आणि घरांच्या किमती वाढत राहतात. युद्धस्थितीमुळे इंधन दरवाढीची भीती असून, त्यामुळे एकंदर महागाई वाढण्याची भीती आहे. बांधकाम साहित्य आणि कच्च्या मालाच्या दरांमध्ये मोठी वाढ झाल्याने घरांचा निर्मितीखर्च वाढला आहे. दुसरीकडे युद्धजन्य स्थितीत अनेक उद्योग बंद पडत असून, त्यांच्यावर अवलंबून लघुउद्योग आणि तेथील हजारो कामगारांना रोजगार गमावण्याची चिंता सतावत आहे. अशा काळात राज्य सरकारचे या क्षेत्रावर करांचा अधिक बोजा न टाकण्याचे धोरण हे अनिश्चिततेच्या काळात उचललेले सावध पाऊल म्हणता येईल. अर्थात रेडीरेकनरचे दर वाढले नसले, तरी राज्यातील अनेक शहरांचे विकास आराखडे आणि प्रादेशिक आराखडे मंजूर झालेले आहेत. तेथील जागांची सद्यस्थिती कागदोपत्री बदलल्याने त्यापोटी अधिक मुद्रांक शुल्काची भर सरकारी तिजोरीत पडू शकते. गेल्या वर्षी रेडीरेकनरमध्ये माफक वाढ झाली, तरी एकूण मालमत्ता खरेदीच्या व्यवहारांचे प्रमाण ४६ लाखांपर्यंत वाढले आहे. त्यामुळे दरवाढ न करताही अधिक महसूल मिळू शकतो, असाही विचार सरकारने केलेला दिसतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेमध्ये करोनाकाळासारख्या आव्हानांची तयारी ठेवण्याचे सूतोवाच केले होते; केंद्र सरकारनेही विविध उद्योगांना मदतीचा हात देऊ केला आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या या निर्णयाकडे बघावे लागेल. महाराष्ट्र हे साऱ्या देशात शहरीकरणात आघाडीवर असलेले राज्य असल्याने मुंबई-पुण्यासह सर्वच शहरे आणि त्यालगत प्रचंड प्रमाणात घरबांधणी सुरू आहे. या क्षेत्रात प्रचंड आर्थिक उलाढाल होत आहे आणि लाखोंच्या संख्येने प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगारांची निर्मिती होत आहे. अशा उद्योगातील चलनवलन सुरू ठेवणे, ही साऱ्या अर्थव्यवस्थेची अपरिहार्यता आहे. त्याबरोबरच स्वतःचे घर असावे, असे प्रत्येक नागरिकाचे स्वप्न असते. मात्र, गृहकर्जाचे हप्ते, फर्निचरपासूनचे खर्च आणि सरकारी कर अशा वेगवेगळ्या खर्चांमुळे प्रमुख शहरांमध्ये घरखरेदी आवाक्याबाहेर जाते. हे स्वप्न साकार करण्यासाठी रेडीरेकनरमध्ये दिलासा देण्याबरोबरच परवडणाऱ्या घरांच्या धोरणाला गती देणे, वेगवेगळ्या शहरांमध्ये व लगतच्या परिसरात नगररचना योजना हाती घेणे, सार्वजनिक वाहतुकीची गतिमान साधने पुरवून काही अंतरावर निवासी भागास चालना देणे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे या वाढत्या वस्तीला पुरेशा पायाभूत सुविधा राबवणे, ही काळाची गरज आहे, हेही लक्षात घ्यायला हवे.

# मिनी लोकसभा निवडणुकांचे वारे!

**२०२९च्या लोकसभा निवडणुकांपूर्वी होणाऱ्या 5 राज्यांतील निवडणुका महत्त्वाचे राजकीय संकेत देतील. या निवडणुकांचे निकाल केवळ प्रादेशिक सत्ता बदलापुरते मर्यादित नसून राष्ट्रीय राजकारणाच्या दिशेने देखील महत्त्वपूर्ण असतील.**



भारताच्या राजकीय पटावर २०२६ हे वर्ष अत्यंत निर्णायक मानले जात आहे. पुढील महिन्यात होणाऱ्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका; पश्चिम बंगाल, तमिळनाडू, केरळ, आसाम आणि पुद्दुचेरी या केवळ प्रादेशिक सत्तांतराचा प्रश्न नसून देशाच्या व्यापक राजकीय प्रवाहाचे दिशानिर्देश ठरवणाऱ्या आहेत. लोकसभा निवडणुकांनंतर पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणावर जनमताची चाचणी होणार असल्याने या निवडणुकांकडे 'सेमीफायनल' म्हणूनही पाहिले जात आहे.

भारतीय राजकीय पटलावर येत्या महिन्यात होणाऱ्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका ही केवळ प्रादेशिक सत्ताबदलाचे प्रकरण नसून राष्ट्रीय राजकारणाच्या भविष्याची दिशा ठरवणारा महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे. पश्चिम बंगाल, तमिळनाडू, केरळ, आसाम आणि पुद्दुचेरी या पाच राज्यांमधील या निवडणुकांचे निकाल भारतीय राजकारणात नवीन समीकरणे निर्माण करतील आणि २०२९च्या लोकसभा निवडणुकांपूर्वी राजकीय पक्षांची ताकद मोजण्याचे महत्त्वाचे मापदंड ठरतील.

ही निवडणूक प्रक्रिया सुमारे १७ कोटींपेक्षा अधिक मतदारांना स्पर्श करणारी असून ८०० हून अधिक विधानसभा मतदारसंघांमध्ये लढती रंगणार आहेत. त्यामुळे याचे राजकीय परिणाम राष्ट्रीय राजकारणावर होईल.

## पश्चिम बंगालमध्ये निजेर माती, निजेर लोक विरुद्ध सोनार बांगला!

पश्चिम बंगालमध्ये पुन्हा एकदा ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष यांच्यात थेट लढत पाहायला मिळणार आहे. २०२१च्या विधानसभा निवडणुकीत टीएमसीने २१३ जागा जिंकून आपले वर्चस्व कायम राखले होते, तर भाजपने ७७ जागा जिंकून मुख्य विरोधी पक्षाची भूमिका स्वीकारली होती. २०२१ मध्ये भाजपने मोठी झेप घेतली होती, परंतु सत्ता हस्तगत करण्यात अपयश आले. यावेळी भाजप संघटनात्मक ताकद, केंद्रातील सत्ता आणि राष्ट्रवादाचा मुद्दा घेऊन मैदानात उतरत आहे, तर तृणमूल स्थानिक ओळख, कल्याणकारी योजना आणि ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वावर भर देत आहे. ममता बनर्जींच्या नेतृत्वाखालील टीएमसीची राजकीय रणनीती मुळात बंगाली अस्मितेवर आधारित आहे. भाजपच्या बाजूने सुवेंदु अधिकारी यांचे नेतृत्व महत्त्वाचे ठरले आहे. त्यांच्याकडे टीएमसीच्या कार्यपद्धतीविरुद्ध भ्रष्टाचार आणि तुष्टीकरणाचे आरोप करण्याची धारदार राजकीय शैली आहे. सीमाभागातील सुरक्षा, बांगलादेशातून होणारी घुसखोरी, तसेच अल्पसंख्यांक मतांचे ध्रुवीकरण हेही निवडणुकीचे निर्णायक घटक ठरू शकतात.

## तमिळनाडूमध्ये पुन्हा भ्रष्टाचार केंद्रस्थानी

तमिळनाडूमध्ये द्रविडीयन राजकारणाचा प्रभाव अजूनही कायम आहे. येथे द्रमुक आणि अण्णाद्रमुक यांच्यातील पारंपरिक संघर्ष आहे, मात्र भाजप आता स्वतंत्र राजकीय शक्ती म्हणून उभे राहण्याचा प्रयत्न करत आहे. द्रमुक सत्तेत असल्यामुळे कल्याणकारी योजनांवर आणि सामाजिक न्यायाच्या मुद्द्यांवर भर देत आहे, तर विरोधक भ्रष्टाचार, बेरोजगारी आणि प्रशासनातील त्रुटींचा मुद्दा उचलत आहेत. डीएमके आणि एआयएडीएमके या दोन मुख्य द्रविडीयन पक्षांच्या आलटूनपालटून राज्य करण्याच्या शर्यतीत आता अभिनेता विजयच्या तमिलगा वेत्री कझगमचा (टीव्हीके) नवा घटक जोडला गेला आहे. एम. के. स्टालिनच्या नेतृत्वाखालील डीएमकेची सध्याची सत्ता मजबूत आहे. डीएमकेची धोरणे मुख्यत्वे सामाजिक न्यायावर आधारित आहेत आणि त्यांनी मोफत रेशन, मोफत बससेवा, निवृत्तीधारकांना आर्थिक सहाय्य अशा लोकप्रिय योजना राबवल्या आहेत. केंद्राशी असलेले संबंध आणि इंडिया आघाडीतील सहभाग या त्यांच्या राजकीय ताकदीचे महत्त्वाचे घटक आहेत. एआयएडीएमकेच्या बाबतीत जे. जयललिता यांच्या निधनानंतर पक्षाची स्थिती अत्यंत नाजूक झाली आहे.

## केरळमध्ये परंपरा- अनुशासन यात संघर्ष

केरळमध्ये परंपरेप्रमाणे एलडीएफ आणि यूडीएफ यांच्यात सरळ संघर्ष आहे. येथे भाजप अजूनही तिसऱ्या क्रमांकावर असली तरी ती आपली उपस्थिती वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. अलीकडील काही नेत्यांच्या पक्षांतरामुळे राजकीय समीकरणांमध्ये थोडेफार बदल दिसून येत आहेत. केरळमधील मुख्य प्रश्नांमध्ये आर्थिक संकट, बेरोजगारी, परदेशी रोजगारावर अवलंबित्व, तसेच शिक्षण आणि आरोग्य व्यवस्थेतील सुधारणा यांचा समावेश आहे. धार्मिक ध्रुवीकरणाचा मुद्दाही येथे हळूहळू महत्त्वाचा होत आहे. केरळच्या राजकारणात पारंपरिकपणे युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट (यूडीएफ) आणि लेफ्ट डेमोक्रॅटिक फ्रंट (एलडीएफ) यांच्यात राजकीय स्पर्धा असते. अलीकडील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये यूडीएफने ५०५ ग्रामपंचायती जिंकून एलडीएफच्या ३४० ग्रामपंचायतींवर मोठे यश मिळवले आहे. हा निकाल २००६ पासूनच्या वामपंथी वर्चस्वाला आव्हान ठरतो आहे. सीपीएमच्या नेतृत्वाखालील एलडीएफची २० वर्षांची राजकीय वर्चस्वता आता प्रश्नचिन्हाच्या खाली आली आहे. पिनराई विजयन यांच्या नेतृत्वाखाली सरकारी कल्याणकारी योजनांचा व्यापक आराखडा तयार केला होता, परंतु स्थानिक प्रशासनातील असंतोष आणि कार्यकर्त्यांमधील अंतर्गत कलह याने पक्षाची स्थिती कमकुवत केली आहे. कोल्लम महानगरपालिकेतील २५ वर्षांच्या वर्चस्वाचा अंत हा एलडीएफसाठी मोठा धक्का ठरला आहे. उमन चांडी आणि रमेश चेन्नीथाला यांच्या नेतृत्वाखालील यूडीएफला इंडियन युनियन मुस्लिम लीगच्या संघटनात्मक कार्यक्षमतेचा फायदा झाला. भाजपच्या बाबतीत तिरुवनंतपुरम महापालिकेतील यश हे त्यांच्या हळूहळू वाढणाऱ्या वावराचे संकेत देते. के. सुरेंद्रन यांच्या नेतृत्वाखाली भाजपने हिंदुत्वाच्या मुद्द्यांवर विशेषतः सबरीमाला मंदिरातील महिलांच्या प्रवेशाच्या मुद्द्यावर आपली राजकीय रणनीती तयार केली आहे. तथापि, केरळमध्ये भाजपची वाढ मर्यादित आहे. कारण राज्यातील मतदारांची बहुसंख्य धर्मनिरपेक्ष आणि प्रगतिशील विचारसरणी आहे.

## आसाममध्ये भाजपची सत्वपरीक्षा

आसाममध्ये भाजपची सत्ता आहे आणि मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांच्या नेतृत्वाखाली पक्ष पुन्हा सत्तेत येण्याचा प्रयत्न करीत आहे. नागरिकत्व दुरुस्ती कायदा (सीएए), राष्ट्रीय नागरिक नोंदणी (एनआरसी), स्थलांतर, तसेच प्रादेशिक अस्मिता हे येथील प्रमुख मुद्दे आहेत. काँग्रेस आणि प्रादेशिक पक्ष एकत्र येऊन भाजपला आव्हान देण्याचा प्रयत्न करत आहेत, परंतु त्यांची एकजूट कितपत प्रभावी ठरेल, हा प्रश्न आहे. आसाममध्ये भारतीय जनता पक्षाचे वर्चस्व असल्याचे स्पष्ट आहे. तरीही या वेळची निवडणूक त्यांची सत्वपरीक्षा पाहणारी आहे.

## पुद्दुचेरीत जटील समीकरण

पुद्दुचेरीसारख्या लहान केंद्रशासित प्रदेशातही राजकीय स्पर्धा तीव्र आहे. येथे स्थानिक नेतृत्व, आघाड्या आणि लहान पक्षांचे समीकरण निर्णायक ठरते. अलीकडील उमेदवार घोषणांमुळे आणि आघाड्यांतील बदलांमुळे येथील राजकारण अधिक गुंतागुंतीचे झाले आहे. पुद्दुचेरीच्या ३० सदस्यीय विधानसभेचे राजकारण अत्यंत गुंतागुंतीचे आहे. सध्या एन. रंगास्वामी यांच्या नेतृत्वाखाली एनडीएचे सरकार आहे. रंगास्वामी हे अखिल भारतीय एन. आर. काँग्रेसचे नेते आहेत आणि भाजपच्या पाठिंब्याने सत्तेत आहेत. विरोधी पक्षांमध्ये द्रविड मुनेत्र कझगम (डीएमके), काँग्रेस आणि इतर क्षेत्रीय पक्षांचा समावेश आहे. पुद्दुचेरीचे राजकारण तमिळनाडूच्या राजकारणाशी जवळचे संबंधित आहे आणि द्रविडीयन राजकारणाचा प्रभाव इथेही दिसून येतो.

या पाच राज्यांतील निवडणुकांमध्ये सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे प्रादेशिक पक्ष विरुद्ध राष्ट्रीय पक्ष असा संघर्ष. भारतीय जनता पक्ष देशभर विस्तार करण्याच्या धोरणावर ठाम आहे. बंगाल, तमिळनाडू आणि केरळसारख्या राज्यांमध्ये आपली पकड मजबूत करणे हे भाजपचे मोठे उद्दिष्ट आहे. दुसरीकडे काँग्रेससाठी ही निवडणूक अस्तित्वाची लढाई आहे. त्यामुळे प्रादेशिक पक्षांसोबत आघाडी करून भाजपविरोधी मतांचे एकत्रीकरण करण्याचा प्रयत्न काँग्रेस करत आहे.

# बदलते जपान-अमेरिका संबंध



पश्चिम आशियाच्या संघर्षातही जपानने महत्त्वाची भूमिका पार पाडावी, असा ट्रम्प यांचा आग्रह होता. पण, जपानच्या शांततापूर्ण धोरणामुळे आपण या युद्धात भाग घेऊ शकणार नसल्याचा संदेश ताकाईची यांनी ट्रम्प यांना दिला.

जपानच्या पंतप्रधान सानाए ताकाईची नुकत्याच अमेरिका दौऱ्यावर गेल्या होत्या. मुदतपूर्व निवडणुकांमध्ये अभूतपूर्व यश मिळवल्यानंतरचा त्यांचा हा पहिलाच अमेरिका दौरा. हा दौरा जेव्हा आखला गेला तेव्हा पश्चिम आशियावर युद्धाचे ढग असले तरी प्रत्यक्ष युद्ध सुरू झाले नव्हते. पण, हा दौरा सुरू असताना युद्धाला दोन आठवडे होऊन गेले होते. या पार्श्वभूमीवर ताकाईची हा दौरा करणार का, याविषयी शंका उपस्थित केल्या जात होत्या. मात्र, हा दौरा झालाच. पण जागतिक माध्यमांमध्ये या दौऱ्याची चर्चा झाली ती ट्रम्प यांच्या वक्तव्यांमुळे.

अमेरिकेने इराणवर केलेल्या हल्ल्याची पूर्वकल्पना अमेरिकेच्या युरोप आणि आशियातील मित्रराष्ट्रांना का दिली नाही, असा प्रश्न एका जपानी पत्रकाराने विचारला. त्यावर 'आश्चर्यजनक हल्ल्याविषयी जपानपेक्षा चांगले कोण जाणते? पर्ल हार्बरवर हल्ला करण्याआधी जपानने तरी आम्हाला कुठे सांगितले होते?' असे ट्रम्प म्हणाले. त्यांच्या या खोचक उत्तराने उपस्थित पत्रकारांत हशा पिकला तरी जपानी पंतप्रधान अतिशय विचित्र परिस्थितीत अडकल्या. आता जपानमध्ये ट्रम्प यांच्याविरोधात राग व्यक्त होत आहे.

खरे तर दुसरे महायुद्ध, पर्ल हार्बर किंवा हिरोशिमा-नागासाकी हे जपान आणि अमेरिका यांच्या संबंधांतले अतिशय संवेदनशील विषय आहेत. विसाव्या शतकाच्या मध्यात या विषयांनी जागतिक राजकारण ढवळून निघाले. आजही दोन्ही देशांमध्ये चर्चा होत असताना भूतकाळातील या घटनांविषयीच्या चर्चा कटाक्षाने टाळल्या जातात. त्यामुळे ट्रम्प यांनी केलेल्या वक्तव्यामुळे उलटसुलट चर्चा केल्या जात आहेत. दुसरे महायुद्ध संपल्यानंतर अमेरिकेने जपानवर वर्चस्व प्रस्थापित केले. अमेरिकेच्या म्हणण्याप्रमाणे जपानला आपली राज्यघटना बदलावी लागली आणि लोकशाहीचा स्वीकार करावा लागला. आजही जपानमध्ये राजघराणे असले तरी खरी शक्ती मात्र संसदेकडे आहे. पण, याशिवाय एक महत्त्वाचा बदल जपानने केला तो म्हणजे जपानला सैन्यव्यवस्था संपुष्टात आणावी लागली. या बदल्यात अमेरिकेने जपानच्या सुरक्षेची जबाबदारी स्वीकारली. आशिया प्रशांत महासागरीय क्षेत्रात अमेरिकेला आपला दबदबा वाढवायचा होता.

जपानच्या शरणागतीमुळे अमेरिकेला आयती संधी मिळाली. कोरिया वा जपानमध्ये अमेरिकेने आपल्या लष्करी तळांची उभारणी सुरू केली. पुढे शीतयुद्धाच्या काळात सोव्हिएत महासंघाच्या आणि त्यानंतर आता चीनच्या वाढत्या महत्त्वाकांक्षांना आळा घालण्याच्या अमेरिकेच्या प्रयत्नांना यामुळे चालना मिळाली. दोन्ही देशांमध्ये झालेल्या संयुक्त सहकार्य आणि सुरक्षा कराराचा फायदा जसा अमेरिकेला होत गेला तसाच तो जपानलाही झाला. महायुद्ध संपल्यानंतर अवघ्या दोन दशकांत जपानने अमेरिकेच्या साहाय्याने पुन्हा एकदा आर्थिक भरारी घेतली. जपानची आर्थिक झेप ही इतर देशांसाठी प्रेरणा ठरली. लष्करी खर्च न करता केवळ आर्थिक आणि सामाजिक प्रगतीवर जपानने लक्ष केंद्रित केले. दुसऱ्या महायुद्धात एकमेकांचे हाडवैरी असणाऱ्या देशांचे संबंध पुढील काळात जगातल्या सर्वात घनिष्ठ मैत्रीपूर्ण संबंधांत परावर्तित झाले.

आज जागतिक परिस्थितीत मोठे बदल घडत आहेत. पूर्व आशियात चीन आणि उत्तर कोरिया डोकेदुखी ठरत आहेतच; पण एकंदरीत जागतिक रचनेत होणाऱ्या बदलांच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्त्वाची आहे. २०२५ मध्ये डोनाल्ड ट्रम्प सत्तेत आले, तर फेब्रुवारी २०२६ मध्ये ताकाईची अभूतपूर्व मतांनी निवडून आल्या. ट्रम्प यांच्या दुसऱ्या सरकारच्या काळात त्यांच्या अमेरिकेच्या मित्रराष्ट्रांकडून अपेक्षा वाढलेल्या दिसतात. अमेरिकेने आजवर मित्रराष्ट्रांच्या सुरक्षेसाठी प्रचंड प्रमाणात आर्थिक भार सोसला; पण आता या देशांनी सुद्धा आपला लष्करी खर्च वाढवावा, अशी ट्रम्प यांची अपेक्षा आहे आणि ती त्यांनी वारंवार बोलून दाखवली आहे. त्याशिवाय, अमेरिका मित्रराष्ट्रांमध्ये जेवढी गुंतवणूक करते, त्या तुलनेत मित्रराष्ट्र करत नाहीत, ही त्यांची तक्रार होती. याच पार्श्वभूमीवर ताकाईची यांच्या दौऱ्याकडे तज्ज्ञांचे लक्ष होते.

जपान-अमेरिका संबंधांचा विचार करताना जपानच्या अंतर्गत राजकारणाचा विचार करणेही गरजेचे आहे. निवडणुकीसाठी प्रचार करताना भविष्यात जपानच्या संरक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल करणार असल्याचे आश्वासन ताकाईची यांनी नागरिकांना दिले होते. उत्तर कोरियाचा वाढत धोका आणि प्रशांत महासागरात वाढणारी चीनची अरेरावी यामुळे जपानच्या सार्वभौमत्वाला आव्हान निर्माण झाले आहे. या परिस्थितीत सुरक्षेसाठी केवळ अमेरिकेवर अवलंबून न राहता याबाबतीत स्वावलंबी व्हावे, असा विचारप्रवाह जपानमध्ये दृढ झाला आहे. ताकाईची या याच प्रवाहाचे नेतृत्व करतात.

जपानच्या घटनेनुसार जपानचे केवळ स्वसंरक्षण दल (डिफेन्सिव्ह फोर्सेस) न ठेवता घटनेत बदल करून लष्कर उभारण्याचा मानस ताकाईची यांनी व्यक्त केला आहे. जपानमध्येही याला वाढता पाठिंबा आहे. पुढील आर्थिक वर्षापर्यंत जपानकडून स्थूल आर्थिक उत्पन्नाच्या वेगाच्या दोन टक्क्यांपर्यंत वाढवून विक्रमी ५८ अब्ज अमेरिकी डॉलर संरक्षणावर खर्च केले जाणार आहेत. अमेरिकेच्या इतर मित्रराष्ट्रांनी सुद्धा संरक्षणावर होणाऱ्या आपल्या खर्चात भरघोस वाढ करावी, असा ट्रम्प यांचा अट्टहास आहे. नाटो गटातल्या अनेक देशांची भूमिका याला पूरक नाही; पण, ट्रम्प सत्तेत आल्यापासून मित्रराष्ट्रांचा अमेरिकेवरचा विश्वास कमी झाला आहे.

त्याच वेळेस ट्रम्प यांचा कल अमेरिका आणि चीन यांचे आर्थिक संबंध जास्तीत जास्त दृढ करण्याकडे आहे. उद्या चीन आणि जपान यांच्यात संघर्ष उद्भवलाच तर अमेरिका काय भूमिका घेईल, याविषयी साशंकताच आहे. कारण ट्रम्प प्रशासनाची या सर्व विषयांवर दुटप्पी भूमिका दिसते. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात ट्रम्प हे चीनचा दौरा करणार आहेत. (पश्चिम आशियातील संघषार्मुळे त्यावर आता प्रश्नचिन्ह आहे.) या पार्श्वभूमीवर ताकाईची यांनी ट्रम्प यांची भेट घेणे महत्त्वाचे ठरते. सध्या सुरू असलेल्या पश्चिम आशियाच्या संघर्षात सुद्धा जपानने महत्त्वाची भूमिका पार पाडावी, असा ट्रम्प यांचा आग्रह होता. पण, जपानच्या शांततापूर्ण धोरणामुळे आपण या युद्धात भाग घेऊ शकणार नसल्याचा संदेश ताकाईची यांनी ट्रम्प यांना दिला असला तरी 'जागतिक शांतता फक्त ट्रम्पच प्रस्थापित करू शकतात,' अशी भूमिकासुद्धा घेतली. इराण विरुद्ध इस्रायल-अमेरिका युद्धाला जपानमध्ये विरोध होत आहे. म्हणूनच या युद्धात अमेरिकेच्या बाजूने उभी राहणे हे ताकाईची यांना शक्य नाही, ही सत्यस्थिती आहे.


असे असले तरी होर्मुझची सामुद्रधुनी बंद झाल्याचा फटका जपानलाही बसणार आहे. शिंझो आबे यांच्या कालखंडात जपान, अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि भारत यांच्यात स्थापन झालेल्या 'क्वाड सुरक्षा परिसंवादा'चे गेल्या एक दीड वर्षांत तीन तेरा वाजल्याचे चित्र आहे. या गटाचा उद्देश हा हिंद-प्रशांत क्षेत्रात चीनची मक्तेदारी मोडून काढण्याचा होता. पण, ट्रम्प यांना त्यात आता फारसा रस राहिलेला नाही. म्हणूनच या भेटीत या प्रश्नावरसुद्धा काही चर्चा होते का, याकडे नवी दिल्लीचे नक्कीच लक्ष राहिले असेल. पण, तसे काहीच झाले नाही. ताकाईची यांचा दौरा वरकरणी अगदी यशस्वी झालेला दिसत असला तरी ट्रम्प यांच्या काळात वॉशिंग्टनमध्ये आज घेतलेले निर्णय उद्यापर्यंत कायम राहतील का, याची निश्चिती नसते. त्यामुळे टोकियोमध्ये धाकधूक कायम राहील, हे मात्र नक्की.

# लाल दहशतीला लगाम



वेगवेगळ्या प्रदेशांतील युद्धांमुळे सारे जग संत्रस्त असताना माओवाद ्यांपासून मुक्ती मिळाल्याच्या घोषणेमुळे गेल्या साडेचार-पाच दशकांतले एक अंतर्गत युद्ध शमले, असे म्हणता येईल. 'देशातून माओवादाचे उच्चाटन झाले,' ही गृहमंत्री अमित शहा यांनी केलेली घोषणा हे महाराष्ट्र, तेलंगण, छत्तीसगड यांसह जवळपास बारा राज्यांची एक ठसठसती जखम भरून येत असल्याचे निदर्शक आहे. '३१ मार्चपर्यंत माओवाद समाप्त होईल,' असे सरकारने गेल्या वर्षीच जाहीर केले होते. त्यानुसार माओवाद्यांची सर्वोच्च संघटना आणि केंद्रीय रचना जवळपास उद्ध्वस्त झाली असून 'रेड कॉरिडॉर'मधील त्यांची दहशत संपुष्टात आली आहे. अन्याय-शोषणमुक्तीच्या तत्त्वज्ञानाला मिळालेली हिंसक कारवायांची जोड आणि त्यातून रुजलेली दहशतीची पाळेमुळे, अशी ही गुंतागुंतीची लढाई अनेक पातळ्यांवर लढली गेली आणि अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर अखेरीस कायद्याच्या राज्याचा विजय झाला आहे. सत्तरच्या दशकाच्या अखेरीला पश्चिम बंगालमधील नक्षलबाडीमध्ये शेतकरी, आदिवासींनी जमीनदारांच्या अन्याय व शोषणाच्या विरोधात शस्त्रे हाती घेतली. चिनी नेता माओ त्से तुंगच्या 'लोकयुद्धा'च्या संकल्पनेमधून उभा राहिलेला माओवाद पुढील दशकभरात महाराष्ट्र- आंध्र प्रदेश अशा राज्यांलगतच्या दंडकारण्यात स्थिरावला. सन १९८०मध्ये 'पीपल्स वॉर ग्रुप' चा उदय आणि त्यांच्या हिंसक कारवायांनी हातपाय पसरण्यास सुरुवात केली. महाराष्ट्रातील गडचिरोली-चंद्रपूर हे आदिवासीबहुल जिल्हे आणि आसपासच्या परिसरात जणू त्यांचीच पयार्यी राजवट उभी राहिली. गरिबांना न्याय मिळवून देण्याच्या उद्देशाने उभ्या राहिलेल्या या व्यवस्थेत हळूहळू खंडणीखोरी आणि गुन्हेगारीमुळे हितसंबंधांचे जाळे तयार झाले होते. सर्वसामान्य आदिवासी-शेतकरी, पोलिस किंवा पोलिसांचे तथाकथित खबरे यांच्या हत्यांची मालिकाच त्यानंतर सुरू झाली. अनेक राजकीय नेते माओवाद्यांचे बळी ठरले. माओवाद्यांनी आजवर दहा हजारांहून अधिक हत्या केल्याची नोंद आहे. काही वेळा सहानुभूती आणि काही वेळा दहशत, यांमुळे जनतेतून मिळणारा पाठिंबा, हे माओवाद्यांचे बलस्थान ठरले. प्रतिकूल परिस्थितीत महाराष्ट्रासह अन्य राज्यांच्या पोलिसांनीही त्यांच्याशी अनेक वर्षे लढा दिला. काही काळापूर्वी माओवाद्यांशी लढण्यासाठी सरकारपुरस्कृत जनसमूहांच्या हाती शस्त्रे देण्याचाही प्रयोग – सलवा जुडूम – करून पाहण्यात आला; त्याला माफक यश लाभले, तरी अन्य काही नवे प्रश्नही उभे राहिले. या दशकाच्या प्रारंभी केंद्र सरकारनेही 'युनिफाइड कमांड'ची स्थापना करून माओवादाविरोधातील लढ्याची सर्वांगीण रणनीती आखली आणि या सर्व राज्यांच्या यंत्रणांच्या संपर्क-समन्वयातून सातत्यपूर्ण कारवायांमधून या लढ्यास यश आले आहे. गेल्या चार वर्षांत माओवाद्यांचे अनेक नेतेही शरण आले. त्यांच्या पुनर्वसनासाठी योग्य धोरणे, संसाधनांची तरतूद, परिसरातील विकासकामे आणि जनतेचा विश्वास, हा कळीचा मुद्दा ठरला आहे. दंडकारण्याचा परिसर आता मोकळा श्वास घेत आहे, त्यामध्ये राजकीय इच्छाशक्तीचा महत्त्वाचा वाटा नक्कीच आहे; मात्र ही शांतता स्थिरावण्यासाठी आणि मोहिमेचे यश सिद्ध होण्यासाठी काही काळ जावा लागेल. घटनाक्रमातून काही धडेही घेतले पाहिजेत. कोणताही हिंसाचार गरिबी-अन्याय किंवा शोषणावरील उपाय ठरू शकत नाही, हे तथाकथित लढ्याला आलेल्या अपयशातून सिद्ध झाले. अशा कोणत्याही चळवळीचे उच्चाटन करण्यासाठी केवळ पोलिसी कारवाया पुरेशा ठरत नाहीत, हेसुद्धा अधोरेखित झाले आहे. कोणत्याही विचारसरणीसाठी स्वतःचा जीव द्यायला तयार होणारे तरुण, हे दहशतवादी-माओवाद्यांच्या हातचे सर्वाधिक घातक शस्त्र ठरते, हे जगभरात वारंवार अनुभवास आले आहे. त्यामुळेच नवी पिढी अशा कोणत्याही कट्टर विचारांच्या आहारी जाऊ नये, याची काळजी घेणे, हे व्यवस्थेचे आद्य कर्तव्य ठरते. त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी गरिबी निर्मूलन, योग्य शिक्षण-बेरोजगारीवर उपाययोजना यांसह लोकशाहीचे संस्कार यांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. या विजयाचे राजकीय श्रेय घेतानाच या निमित्ताने पक्षीय श्रेयवाद आणणेही अनुचित ठरेल. लोकशाहीविरोधी-हिंसाचाराच्या समर्थक विचारांना विरोध करताना लोकशाही मानणाऱ्यांनाही त्यात भरडण्यातून राजकीय कुरघोडीविना काही हाती लागणार नाही. काँग्रेस आणि सरसकट डाव्या विचारांना लक्ष्य करण्यापेक्षा कोणत्याही तत्त्वज्ञानावर आधारलेल्या हिंसाचाराचा स्पष्ट शब्दांत निषेध, हेच या समस्यांवरील शाश्वत उत्तर आहे.

# पौष्टिक गोड सॅंडविच



**साहित्य :** खजूर, अंजीर, मनुका, अक्रोड, बदाम, जॅम, ब्रेड, बटर.

**कृती :** सगळ्यात आधी खजूर, अंजीर, मनुका यांचे बारीक तुकडे करून घ्या. अक्रोड, बदाम किंचित भाजून जाडसर भुगा करून घ्या. नेहमीप्रमाणे ब्रेडला बटर आणि जॅम लावून घ्या. त्यावर हा सुका मेवा पसरा आणि त्याचे सॅंडविच बनवा. यामध्ये आवडत असेल तर जॅमऐवजी मधही वापरता येईल. सुके किवी, जदाळू, पिच यांचाही वापर करू शकता.

# केसांच्या समस्यांचे समाधान !

**महागडे केमिकलयुक्त हेयर प्रॉडक्ट सोडून तुम्ही नॅचरल उपायांच्या मदतीने केसांच्या सर्व समस्येला दूर करू शकता. बटाटा एक अशी वस्तू आहे ज्याचे सेवन केल्याने तुम्ही केसांच्या सर्व त्रासांपासून मुक्त होऊ शकता.**





**बऱ्याच** वेळा असं होतं की जास्त केमिकल आणि शॅम्पूचा वापर केल्याने केसांचे बरेच आजार होण्याची शक्यता असते. जास्त करून महिलांचे कोरडे केस, कोंडा आणि केसांची ग्रोथ थांबल्यासारखी वाटते. महागडे केमिकलयुक्त हेयर प्रॉडक्ट सोडून तुम्ही नॅचरल उपायांच्या मदतीने केसांच्या सर्व समस्येला दूर करू शकता. बटाटा एक अशी वस्तू आहे ज्याचे सेवन केल्याने तुम्ही केसांच्या सर्व त्रासांपासून मुक्त होऊ शकता. तुम्ही बटाट्यात मध, दही आणि लिंबाचा रस मिसळून तुमच्या केसांशी संबंधित सर्व समस्यांपासून मुक्ती मिळवू शकता.

**दाट आणि सॉफ्ट केसांसाठी**

दोन ते तीन बटाटे घ्या, याला सोलून याचे पेस्ट तयार करा. यानंतर या पेस्टमध्ये अंड्याचा पिवळा भाग आणि मध मिसळा. त्यानंतर या पेस्टला केसांवर लावा. याला काही वेळ वाळू द्या. जेव्हा हा पॅक वाळून जाईल तेव्हा चांगल्या माइल्ड शॅम्पूने केस धुवून घ्या. दोन ते तीन वेळा याचा वापर केल्याने तुम्हाला केसांमध्ये फरक दिसू लागेल.

**लांब केसांसाठी**

दोन बटाटे घ्या आणि याचा रस काढा. यात दोन चमचे एलोवेरा जेल मिसळा. या मिश्रणाला केसांच्या मुळांना लावा. याला ३० ते ४० मिनिटांपर्यंत केसांमध्ये राहू द्या. यानंतर पाण्याने केस धुवून घ्या. लगेचच शॅम्पू लावायची गरज नसते.

**कोंडा असलेल्या केसांसाठी**

एक किंवा दोन बटाटे घेऊन त्यांचा रस काढून घ्या. या रसात लिंबू आणि दही मिसळून त्या पेस्टला केसांना लावून थोड्या वेळेसाठी राहू द्या. नंतर एखाद्या चांगल्या शॅम्पूने केस धुवून घ्या.

# दुधात हे मिश्रण घालून पायल्याने शांत झोप लागेल

**निरोगी** स्वास्थ्यासाठी संतुलित आहार, नियमित व्यायाम आवश्यक आहे. पण त्याचबरोबर पुरेशी झोप घेणेदेखील गरजेचे आहे. आजकाल शांत झोप मिळणे दुर्मिळ झाले आहे. लांबलेल्या कामाच्या वेळा, ताण-तणाव यामुळे नीट झोप लागत नाही. आपल्यापैकी अनेकांनी याचा अनुभव घेतला असेल. झोप न लागण्याची अनेक कारणे असतील, पण त्यामुळे आरोग्यावर परिणाम होऊन त्याच्या समस्या उद्भवू लागतात. अपुऱ्या झोपेमुळे कामावर देखील परिणाम होतो. अधिक चांगले काम करण्यासाठी शांत झोपेची गरज असते. कारण त्यामुळेच मन शांत, प्रसन्न राहतं व शरीराला ऊर्जा प्राप्त होते. म्हणून शांत झोप येण्यासाठी हा घरगुती उपाय खूपच फायदेशीर ठरतो. हा उपाय अतिशय सोपा आहे. खसखस गोल्डन ब्राऊन होईपर्यंत तव्यावर थोडी भाजून घ्या. त्यानंतर खसखस ग्राइंड करून घ्या. मग कोमट दुधात जायफळ आणि खसखस पावडर घाला. नीट मिक्स करून दूध प्या. त्यामुळे तुम्हाला नक्कीच शांत झोप लागण्यास मदत होईल.



# फणस खाण्याचे आरोग्याला फायदे तोटे



**सध्या बाजारात फणस सर्वत्र मिळतो. फणस खाल्ल्यामुळे आरोग्याला अनेक फायदे होतात. फणस आरोग्यासाठी फार लाभदायक आहे. फणसात विटॅमिन ए, सी, थाइमिन, पोटॅशियम, कॅल्शियम, आयरन, फॉलिक ॲसिड, मॅग्नेशियम असते. जे आपल्या शरीरासाठी आवश्यक असते. फणस हे जगातील सर्वात मोठे फळ आहे. डॉक्टर देखील हे खाण्याचा सल्ला देतात. फणसामध्ये काही असे गुण आहेत ज्यामुळे अनेक समस्या दूर होतात. फणस वजन कमी करण्यास मदत करतो. त्याप्रमाणे रक्तदाबही मर्यादित राहतो. फणस खाल्ल्याने डोळ्यांचे विकारही मोठ्या प्रमाणात कमी होतात. फणसाला इंग्रजीमध्ये Jackfruit असे म्हणतात.**

- फणसाची पाने स्वच्छ साफ करून सुकवल्यानंतर पानांचे चूर्ण तयार करा. त्यामुळे पोटाचे विकार कमी होतात.
- तोंड आल्यास फणसाची कच्ची पाने चावून थुंकल्याने तोंडाचे विकार कमी होतात.
- मधुमेह असलेल्या व्यक्तींनी नियमित फणसाच्या पानांच्या रसाचे सेवन करणे फायद्याचे असते. त्याचप्रमाणे उच्च रक्तदाब असलेल्या व्यक्तींसाठी सुद्धा हा रस गुणकारी आहे.
- फणसाच्या सालीपासून निघणारे दूध शरीराच्या सुजलेल्या किंवा दुखापत झालेल्या भागात लावल्यास आराम मिळतो. गुडघ्यांचे आजारही मोठ्या प्रमाणात कमी होतात.
- फणसाच्या कोवळ्या पानांना बारीक करून त्यापासून लहान-लहान गोळ्या तयार करा. त्यामुळे गळ्याचे आजार कमी होतात.
- पिकलेला फणस खाल्ल्याने पोट साफ होण्यास मदत होते. त्यामुळे अपचनाच्या समस्या दूर होतात.
- दमा असलेल्या रुग्णांसाठी फणसाची मुळे फार गुणकारी असतात. फणसाच्या मुळांना उकळून, त्या पाण्याच्या सेवनाने दमा नियंत्रित राहण्यास मदत होतो.
- जर तुम्ही थायरॉइडच्या समस्येचा सामना करत असाल, तर तुम्ही फणसाचे सेवन करावे. फणसात कॉपर तत्त्व असतात, ज्यामुळे थायरॉइड ग्रंथीचा स्राव संतुलित राहतो.
- फणसात असलेल्या मॅग्नेशियममुळे हाडं मजबूत होतात.
- फणसाच्या बियांच्या पावडरमध्ये मध मिसळून लावल्यामुळे चेहऱ्यावरील डाग दूर होतात.

फणस आरोग्यासाठी असला, तरीही त्याचे तोटे देखील आहेत पिकलेल्या फणसामुळे कफ होतो, त्यामुळे सर्दी-खोकला, अजीर्ण इत्यादी आजार तसेच गर्भवती स्त्रियांनी फणसचे सेवन करू नये. तसेच फणस सेवन केल्यावर, पान खाण्यामुळे पोट फुगते. त्यामुळे फणस खाल्ल्यानंतर पान खाऊ नये.


# पाण्यात पाय बुडवून ठेवण्याचे फायदे



**मॉलमध्ये** किंवा मार्केटमध्ये फिरायला तर सर्वांना आवडतं, पण तिथून आल्यावर जो थकवा येतो त्याने अगदी काही काम नको नकोसं वाटतं. पण असा थकवा आपण काही वेळातच दूर करू शकता. त्यासाठी हे करा ▮एका टबमध्ये कोमट पाण्यात थोडंसं मीठ घालून आपले दोन्ही पाय बुडवा. याने थकवा दूर होतो आणि चालताना सूज आली असल्यास त्यावरही राहत मिळते. ▮ज्या लोकांना रात्री झोप न येण्याची तक्रार असते त्यांनी हा प्रयोग नक्की अमलात आणावा. झोपण्यापूर्वी कोमट पाण्यात १५ ते २० मिनिटे पाय बुडून ठेवावे. ▮ याने रक्तप्रवाह सुरळीत होतो. ▮ जे लोक रात्रभर एकाच कुशीवर झोपतात, त्याने सकाळी उठून हा प्रयोग करावा. याने दिवसभर फ्रेश जाणवेल. ▮या प्रयोगाने किडनीची एनर्जी वाढते. ▮ संधिवाताची तक्रार असलेल्या लोकांनी पाण्यात दालचिनी आणि काळे मिरे टाकून पाय पाण्यात ठेवावे. ▮हा प्रयोग जेवण झाल्यावर करणे योग्य ठरेल. ▮ लो ब्लड प्रेशरची तक्रार असलेल्यांनी गरम पाण्यात पाय ठेवून बसू नये. मधुमेही रुग्णांनी पण हा प्रयोग करू नये.

# टॅटू काढून टाकण्यापूर्वी या गोष्टींकडे अवश्य लक्ष द्या!

**उत्साहाच्या भरात अनेकदा अंगावर वेगवेगळ्या ठिकाणी टॅटू काढले जातात. काहीजण आपल्या साथीदाराचे नाव टॅटूमध्ये बनवतात. पण कालांतराने नात्यात दुरावा आल्यानंतर तेच नाव नकोसे वाटते. अशावेळेस टॅटू काढून टाकण्यासाठी नेमके काय करावे? ही प्रक्रिया त्रासदायक असते का? याबाबतचा खास सल्ला डर्मेटोलॉजिस्ट डॉ. के. खतुजा यांनी दिला आहे.**



**▮ टॅटू क्रीम परिणामकारक नसतात**

टॅटू निघून जाण्यासाठी क्रीम्स किंवा बाम यांचा वापर करण फायदेशीर नाही. कोणत्याच घरगुती उपायांनी किंवा क्रीम लावल्याने टॅटूपासून सुटका मिळत नाही.

**▮ लाल किंवा पिवळ्या रंगाचे टॅटू कायमचे जाणे कठीण आहे**

प्रत्येक रंग शोषून घेण्यासाठी काही विशिष्ट वेव्हलेंग्थ काम करतात. त्यामुळे एकाच वेव्हलेंग्थमुळे सारेच रंग जाणे कठीण असते. अनेकजण काळे आणि निळे घालवणारे लेझर वापरतात. त्याचाच वापर करून लाल किंवा पिवळा रंग जाणे मुश्कील आहे.

**▮ लेझर त्रासदायक ठरत नाहीत**

लेझर ट्रीटमेंटपूर्वी त्वचेवर काही सोल्युशन लावून तेथील भागातील संवेदनशीलता कमी केली जाते. त्यामुळे काही सेकंद तुम्हाला त्रास जाणवतो. लेझर किरणांमुळे वातावरणातील उष्णता अधिक वाढते. म्हणूनच उपचारांदरम्यान आयवेअर दिली जातात. म्हणजे तुम्हाला काहीच दिसत नाही.

**▮ हात, पाय, घोट्यावरील टॅटू काढणे कठीण आहे**

लोअर बॅकच्या भागापेक्षा बोटाच्या सांध्याजवळील टॅटू काढणे कठीण असते. शरीरात रक्तवाहिन्यांजवळील भागातील टॅटू काढणे अधिक सुकर आहे. पाय, घोटा किंवा हात या भागावरील टॅटू काढणे कठीण आहे.

**▮ अनेक लेझर सेशन्स लागतात**

टॅटू पूर्णपणे काढून टाकण्यासाठी सुमारे १०-१५ सेशन्स लागतात. त्वचेला पुन्हा पूर्ववत होण्यासाठीदेखील वेळ द्यावा लागतो.

**▮ टॅटूच्या खुणा राहतात**

टॅटू पूर्णपणे काढला तरीही त्याच्या थोड्याफार खुणा राहतात. टॅटू काढला तरीही तो कोणत्या भागावर होता हे तुमचे मित्र नक्कीच ओळखू शकतात.

**▮ लेझर ट्रीटमेंटदरम्यान बर्निंग स्मेल येतो**

टॅटू काढताना तुम्हाला काही जाणवत नसले तरीही वास येतो. यादरम्यान त्वचेवर लेझरची किरणे जेव्हा त्वचेत जातात तेव्हा laser plume घटक वातावरणात मिसळल्यानंतर बर्निंग स्मेल येतो.

**▮ काही काळ दुर्गंधीचा त्रास होईल**

स्कार/डाग पडू नये, त्वचा पूर्ववत व्हावी याकरिता काही जेलचा वापर करा. पण ॲन्स्थेशियाचा प्रभाव जसा कमी होतो तसा काही दिवस त्रास जाणवतो.

# चेहऱ्यावर पुन्हा त्याच जागी पिंपल का येतो ?



**पिंपलचा** त्रास टाळण्यासाठी घरगुती उपाय, उत्तम फेसवॉश वापरणे यासारखे सारे खटाटोप करता. परंतु, अनेकांमध्ये विशिष्ट काळानंतर पुन्हा त्याच जागी पिंपल येण्याची समस्या आढळून येते. पिंपल्सचे चेहऱ्यावर त्याच त्याच जागी पुन्हा येणे यामागील नेमके काय याबद्दलचा खास सल्ला डर्मेटोलॉजिस्ट डॉ. सेजल शहा यांनी दिला आहे. त्वचेच्या खाली वाढणारे पिंपल्स अनेकदा त्वचेवर दिसत नाहीत. त्वचेवरील छिद्रांमधून जेव्हा तेल बाहेर पडण्याची प्रक्रिया वाढते तेव्हा सूजही वाढते. त्वचेच्या खाली तेलामुळे गोलाकार फुगवटा निर्माण होतो. त्याचे प्रमाण तेलावर अवलंबून असते. तसेच तुम्हाला सतत चेहऱ्याला हात लावण्याची सवय असेल तर पुन्हा त्याच जागी ॲक्ने वाढण्याचा धोका अधिक असतो. सतत चेहऱ्याला हात लावण्याच्या सवयीमुळे चेहऱ्यावरील मळ, तेल पुन्हा छिद्रांमध्ये ढकलला जातो. यामुळे पिंपल्सची वाढ अधिक प्रमाणात होते.

**पिंपलचा त्रास कमी करण्यासाठी काय कराल ?**

पिंपलमध्ये पस निर्माण झालेला असल्यास त्याला फोडण्याचा मोह टाळा. त्याला सतत हात लावू नका. ते आपोआपच कमी होण्यासाठी थोडा वेळ द्या. किंवा डर्मेटोलॉजिस्टचा सल्ला घ्या. अनेकदा पिंपल फोडल्यानंतरही त्यातील सारा पांढरा भाग/पस बाहेर पडत नाही. त्यामुळे पुन्हा त्याजागी पिंपल वाढण्याची शक्यता निर्माण होते. म्हणूनच चेहरा पूर्णपणे स्वच्छ करण्यासाठी salicylic acid युक्त फेसवॉशचा वापर करा. यामुळे अतिरिक्त तेल काढण्यास मदत होते. benzoyl peroxide चा समावेश असलेल्या उत्पादनांची निवड केल्यास त्वचेवर वाढणारे आणि ॲक्नेच्या निर्मितीला कारणीभूत ठरणाऱ्या बॅक्टेरियांचा प्रभाव कमी करण्यास मदत होते.

# चमकदार दातांसाठी झोपण्याच्या वेळेस करा ही कामे




▮ नारळाचे तेल ऑरगॅनिक आणि नॅच्युरल टीथ व्हाईटनर आहे. नारळाच्या तेलाने तुम्ही तुमचे दात चमकवू शकता. यासाठी थोडेसे नारळाचे तेल घेऊन १५ मिनिटे तोंडात ठेवा. त्यानंतर साध्या पाण्याने चूळ भरा. यामुळे फायदा होईल.

▮ दात चमकवण्यासाठी सोपा उपाय म्हणजे स्ट्रॉबेरीज. स्ट्रॉबेरीच्या गरात चिमूटभर बेकिंग सोडा मिसळा. हे मिश्रण ब्रशवर घेऊन दात घासा. यामुळे दातांवरील पिवळेपणा दूर होईल.

▮ ॲपल सिडर व्हिनेगरही दात चमकावण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. याचे काही थेंब दातांवर चोळा. अधिक फायद्यासाठी सकाळी ब्रश करण्याआधी या व्हिनेगरने दात चोळा.

# किरकोळ आजारांकडे दुर्लक्ष नको

**आपल्या दैनंदिन जीवनमानात अगदी किरकोळ आजार हे कधीकधी दुर्लक्षिले जातात, मात्र त्याचा त्रास जाणवू लागला की त्यानंतर डॉक्टरकडे धाव घेतली जाते. मात्र अगदी किरकोळ वाटणारे दुखणे हे एखाद्या आजाराचे कारण आहे असे समजले की मग मनात भीती निर्माण होते. शिवाय त्या आजाराचे गंभीर परिणाम आयुष्याची चिंता, खर्च आदी गोष्टींचे टेन्शन निर्माण होऊन मग वेळीच इलाज केला असता, तर बरे झाले असते असे वाटून जाते. यावेळी अगदी किरकोळ म्हणून वाटणारे दुखणे हे एखाद्या गंभीर आजाराचे लक्षण आहे, असे वाटले तर त्यावर वेळीच इलाजही केला जाऊ शकतो.**



**पित्त :** आपल्याला नियमित काही खाल्ले तर त्याचा त्रास होतो. खाल्लेले पचत नाही, किंवा भूकच लागत नाही. छातीत जळजळ, तेलकट किंवा दुपारच्या जेवणाव्यतिरिक्तही काही खाल्ले तरी ते पचत नाही, म्हणून मग ते किरकोळ पित्तावर ढकलले जाते. पण मग त्याचा अति त्रास झाला की, मग डॉक्टरकडे जाण्यावाचून पर्याय उरत नाही. पित्तामुळे काही खाणे होत नाही. यामुळे एकप्रकारची त्रस्तता दिसून येते. मात्र यावर वेळीच इलाज न केल्यास याचा परिणाम पित्ताचे खडे होणे आदीसारख्या समस्या निर्माण होण्याकडे दिसून येतो. मग पित्ताचे खडे काढण्यासाठी ऑपरेशन केली जातात.

**पोटदुखी :** पोटदुखीसारख्या वारंवार उद्भवणाऱ्या आजाराकडे बरेचदा दुर्लक्ष केले जाते. काही घरगुती उपाय करून किंवा अशा दुखण्यांकडे दुर्लक्ष करून ती किरकोळ म्हणून त्याकडे दुर्लक्ष केले जाते. मात्र मासिक पाळीच्या वेळी पोटात दुखणे, किंवा इतरवेळी वारंवार पोटात दुखणे हे नेहमीचेच म्हणूनही त्याकडे फारसे लक्ष दिले जात नाही. एका उदाहरणामध्ये एका महिलेच्या वारंवार पोटात दुखण्याच्या तक्रारीमुळे काही घरगुती इलाज केल्यानंतरही काही गुण नाही म्हणून मग डॉक्टरी उपाय करण्याचे ठरले. स्टोनमुळे पोटात दुखत असावे असा अंदाज करून डॉक्टरनेही त्यावरील औषधे सुरू केली. काही पथ्ये सांगून औषधांना खर्चदेखील झाला. मात्र, तरीदेखील हे दुखणे सुरूच राहिल्याने शेवटी तज्ज्ञांकडून तपासणी केली असता, गंभीर आजाराचे निदान झाले आणि हेच वारंवार दुर्लक्षिले गेलेले दुखणे आयुष्याची चिंता भेडसावणारे ठरले.

**डोकेदुखी :** अगदी कोवळ्या वयाची मुले आपले डोके दुखते म्हणून अगदी डोके धरून बसतात. यावेळी लहान मुलांना चष्मा लागणे स्वाभाविक आहे म्हणून त्यांना चष्मा असावा असा अंदाज करून डोकेदुखीच्या आजाराकडे बरेचदा दुर्लक्ष केले जाते. शालेय जीवनात अशा तक्रारी वारंवार उद्भवताना दिसून येतात. चक्कर येणे, डोके दुखणे अशा आजाराकडे दुर्लक्ष करण्यापेक्षा लहान मुलांची काळजी घेणे आवश्यक आहे.

# स्मरणशक्ती वाढवण्यासाठी 'हाकिनी योगमुद्रा' उपयुक्त



**नववर्षाचा** उल्लास आता सरला आहे आणि विद्यार्थी वर्गाला आता वेध लागले आहेत ते लवकरच येणार असलेल्या वार्षिक परीक्षांचे. सर्वसाधारणपणे मार्च ते एप्रिल महिन्यांच्या दरम्यान होणार असलेल्या या परीक्षांची तयारी, विद्यार्थी आतापासून करण्यास सुरुवात करीत असतात. पालकही या काळामध्ये मुलांच्या खाण्या-पिण्याची, त्यांच्या तब्येतीची काळजी घेण्यामध्ये कोणतीही कसर बाकी ठेवत नाहीत. या काळामध्ये मुलांची स्मरणशक्ती चांगली राहावी याकरिता योग्य आहार, नियमित आणि पुरेशी झोप मुलांना मिळणे आवश्यक असते. यामुळे शारीरिक आणि मानसिक तणाव दूर होण्यास मदत होते. मुलांची स्मरणशक्ती चांगली राहावी, याकरिता योगसाधनेची मदतदेखील घेता येऊ शकेल. मेंदू सक्रिय राहून स्मरणशक्ती चांगली राहावी याकरिता योगसाधनेमध्ये हाकिनी मुद्रा सांगितली गेली आहे. एखाद्या गोष्टीचा विसर पडत असल्यास ही मुद्रा लावून त्या वस्तूचे स्मरण करण्याचा प्रयत्न केल्याने ती गोष्ट आठवण्याची शक्यता मोठी असते. विद्यार्थ्यांच्याखेरीज ज्यांना वारंवार काही ना काही गोष्टी विसरण्याची सवय असते, त्यांच्यासाठी देखील ही मुद्रा लाभदायी आहे. ही मुद्रा करण्यासाठी दोन्ही हातांच्या पाचही बोटांचे अग्रभाग जुळवावे. त्यानंतर डोळे वरच्या बाजूला फिरवून त्यांवर अगदी हलका ताण द्यावा. श्वास घेत आपली जीभ हिरड्यांना टेकवावी. त्यानंतर श्वास सोडत जीभ पूर्वस्थितीत आणावी. ही मुद्रा करताना श्वासोच्छ्वास दीर्घ असावा. विद्यार्थ्यांकरिता स्मरणशक्ती वाढवण्याच्या दृष्टीने ही मुद्रा अतिशय लाभदायक आहे.

# इंटरनेटवरील नको त्या गोष्टींपासून मुलांना असे ठेवा दूर

**आजच्या** डिजिटल जगात, इंटरनेटचा वापर थोरा-मोठ्यापासून ते लहान मुलापर्यंत प्रत्येक व्यक्ती करतो. लहान मुलांना इंटरनेटवर सहसा ऑनलाइन व्हिडीओ किंवा त्यांच्या वयोगटाशी संबंधित कार्टून इत्यादी यूट्यूबवर पाहायला आवडते. मात्र इंटरनेटवर अनेक प्रकारचे कंटेंट उपलब्ध असतात. ज्यामुळे मुले भरकटू शकतात. असे होऊ नये याकरिता मुलांच्या इंटरनेट ॲक्टिव्हिटीवर लक्ष ठेवणे आणि त्यासाठी सुरक्षित पद्धतींचा अवलंब करणे अत्यंत आवश्यक आहे. तुम्हालाही तुमच्या मुलांचा इंटरनेट वापर सुरक्षित ठेवायचा असेल तर, ही माहिती तुमच्यासाठी. यामध्ये आज आम्ही चुकीच्या कंटेंटपासून



मुलांचे संरक्षण करण्याच्या काही सोप्या टिप्स सांगणार आहोत. जाणून घेऊया.

**पॅरेंट्स कंट्रोल्स वापरा :**

आजकाल गुगलसह यूट्यूब आणि इंस्टाग्रामसारख्या अनेक प्लॅटफॉर्मवर पेरेंट्स कंट्रोल सुविधादेखील उपलब्ध आहे. तुमची मुले नियमितपणे वापरत असलेले ॲप्स नियंत्रित करण्यासाठी तुम्ही याचा वापर करू शकता.

**मुलांना इंटरनेट सुरक्षिततेबद्दल शिकवा**

हे सर्वात महत्त्वाचे काम आहे. कारण मुलांच्या ॲक्टिव्हिटीवर लक्ष ठेवणे सोपे काम नाही. अशात, मुलांना इंटरनेटवरील धोक्यांची माहिती देणे आणि त्यांना इंटरनेट वापरण्याच्या योग्य मार्गांची जाणीव करून देणे आवश्यक आहे. यासोबतच मुलांना ऑनलाइन पेमेंट आणि मालवेअरच्या धोक्यांबाबत आवश्यक माहिती दिली पाहिजे.

**स्वतंत्र ई-मेल आयडी तयार करा :**

तुम्ही मुलांसाठी वेगळा ई-मेल आयडी देखील तयार करू शकता, त्यामुळे वेब ब्राऊझिंग दरम्यान अनावश्यक जाहिराती टाळता येतील. यासोबतच तुमची मुलं कोणत्या प्रकारचा कंटेन्ट पाहत आहे याची अचूक माहितीही तुम्हाला मिळेल. त्याच वेळी, नवीन ई-मेल आयडीवरून ब्राऊझरच्या मदतीने तुम्ही असुरक्षित वेबसाइट आणि कुकीज बंद करू शकता.

# मुंबई पोलिसांनी उतरवले व्हीआयपींचे दिवे!

## दोन दिवसांत 80 वाहनांवर कारवाई, लोकप्रतिनिधी, मंत्र्यांच्या खासगी वाहनांचा समावेश

■ **बातमी /लेख,**
**प्रीती दिपक नाईक**

महापौर रितू तावडे यांनी वाहनांवर लावलेल्या लाल-निळ्या फ्लॅश लाइटनंतर व्हीआयपींच्या वाहनांवरील दिवे पुन्हा चर्चेत आले होते. ही व्हीआयपी संस्कृती रडारवर आल्यानंतर मुंबई वाहतूक पोलिसांनी दोन दिवसांत तब्बल ८० वाहनांवरील दिवे उतरविले. यामध्ये अनेक लोकप्रतिनिधी, मंत्री, व्हीआयपी व्यक्ती आणि त्यांच्या नातेवाइकांच्या खासगी वाहनांचा समावेश आहे. पोलिसांनी या धडक मोहिमेत लाल, पिवळे आणि निळ्या रंगाचे ८० दिवे आणि तीन सायरन जप्त केले.

**तक्रार करा**
खासगी वाहनावर कुणी पिवळा, निळा किंवा लाल रंगाचा दिवा अथवा फ्लॅशिंग लाइट लावले असल्याचे दिसल्यास त्याची तक्रार मुंबई किंवा वाहतूक पोलिसांच्या ह्यएक्सह्ण अकाउंटवर किंवा वाहतूक पोलिसांच्या हेल्पलाइनवर करा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.



सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, पोलिस, पालिका, रुग्णालये, अग्निशमन दल अशा आपत्कालीन सेवा वगळता अन्य कुणालाही वाहनांवर कोणत्याही प्रकारचे दिवे वापरण्याची परवानगी नाही. असे असतानाही आमदार, खासदार, मंत्री, त्यांचे पीए तसेच राजकीय क्षेत्रातील इतर नेते आणि त्यांचे नातेवाईकही व्हीआयपी वागणूक मिळावी तसेच वाहतूककोंडीतून वाट काढण्यासाठी वाहनांवर लाल, पिवळे आणि निळ्या रंगाचे डोम लाइट्स (फ्लॅशिंग दिवे) लावून फिरताना दिसतात.

याबाबत वाहतूक पोलिसांकडे वेगवेगळ्या माध्यमांतून सर्वसामान्य नागरिकांच्या अनेक तक्रारी येत होत्या. त्यातच महापौर रितू तावडे यांच्या वाहनांवरील फ्लॅशिंग दिवे अधिकच चर्चेत आले.

वाहतूक पोलिसांनी वांद्रे आणि मरीन ड्राइव्ह परिसरात १ आणि २ एप्रिल रोजी विशेष मोहीम हाती घेतली. मरीन ड्राइव्ह वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक योगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली या ठिकाणी कारवाई करण्यात आली. तर, व्हीआयपी रेलचेल असलेल्या वांद्रे परिसरात सहायक पोलिस आयुक्त मुबारक शेख यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक पोलिसांनी कारवाई केली.

**वाहनांची नोंदणी रद्द होणार?**

ज्या वाहनांवर कारवाई करण्यात आली, त्या वाहनांचा तपशील आरटीओकडे पाठविण्यात येणार असून, या वाहनांची नोंदणी रद्द करण्याची शिफारस केली जाणार असल्याची माहिती एका अधिकाऱ्याने दिली. इतकेच नाही तर पुढील कारवाईसाठी या वाहनांचे चालक आणि मालक यांच्यावर गुन्हा दाखल होऊ शकतो, असेही हा अधिकारी म्हणाला.

## महाराष्ट्र मंत्रिमंडळ निर्णय
## दिव्यांगांसाठीच्या शिष्यवृत्तीत वाढ

■ **मुंबई। प्रतिनिधी,**



राज्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय बुधवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या निर्णयामुळे शिशुवर्ग ते आठवी, नववी ते दहावी तसेच अकरावी आणि बारावीत शिकणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या रकमेत ४०० ते ८०० रुपयांनी वाढ होणार आहे.

निर्णयानुसार दिव्यांगत्वाच्या सर्व २१ प्रकारातील राज्यातील शिशुवर्ग ते आठवीच्या विद्यार्थ्यांना दरमहा ५०० रुपये, नववी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना दरमहा ८०० रुपए (निवासी), ६०० रुपए (अनिवासी), अकरावी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना दरमहा एक हजार रुपए (निवासी), ८०० रुपए (अनिवासी) शिष्यवृत्ती देण्यात येईल.

यापूर्वी शिष्यवृत्तीची रक्कम दरमहा १०० ते २०० रूपयांच्या दरम्यान होती. याशिवाय अकरावी आणि बारावीच्या दिव्यांग विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क तसेच अंध विद्यार्थ्यांसाठी दरमहा १५० रुपए वाचक भत्ता आणि दरवर्षी प्रत्यक्ष खर्चाच्या मर्यादेत १ हजार ५०० रुपए अभ्यास दौऱ्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येईल. बैठकीत या योजनेसाठी अपेक्षित २३ कोटी ११ लाख रूपयांच्या आवर्ती तरतुदीस मान्यता देण्यात आली.

## अशोक खरातनंतर नाशिकमध्ये आणखी एक सेक्स स्कँडल
## बिझनेसमनचा टॅब चोरीला अन् मग 200 अश्लील व्हिडीओ समोर




**नाशिक बिझनेसमनचा टॅब चोरीला अन् मग...**
नाशिक पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार नाशिकमधील एका बड्या बिझनेसमनच्या ऑफिसमधून टॅब चोरीला गेला. चोरी करणाऱ्यांनी या टॅबमधील सर्व डेटा मिळवला. ज्यात त्यांना त्या व्यावसायिकाचे मैत्रिणीसोबत असलेले अश्लील व्हिडीओ सापडले. याच अश्लील व्हिडीओला व्हायरल करण्याची धमकी देत त्यांनी बिझनेसमनला खंडणी मागितली. चोरांनी बिझनेसमनकडे 12 लाखांची खंडणी मागितली. यानंतर बिझनेसमनने सातपूर पोलीस ठाण्यात टॅब चोरीची तक्रार दाखल केली.

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

गेल्या काही दिवसांपासून नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरण गाजत असताना नाशिकमधून एक अजून स्कँडल उघडकीस आलंय. सातपूरमधील एका व्यावसायिकाचा टॅब ऑफिसमधून चोरी गेला आणि त्यानंतर 200 अश्लील व्हिडीओ समोर आले आहेत. नाशिकच्या एका बड्या व्यावसायिकाचे त्याच्या मैत्रिणीसोबतचे हे व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी चोरी करणाऱ्यांनी दिली. त्यानंतर हा सर्व प्रकार समोर आला आहे.

बिझनेसमन तक्रारीदरम्यान पोलिसांना सांगितलं की, 2 एप्रिल 2026 दुपारी 12 वाजता मोबाईलवर एक फोन आला. त्यावर त्यांनी धमकी दिली की, मला 7 वाजेपर्यंत 50 हजार रुपये द्या आणि तुमच्या टॅब घेऊन जा. या फोननंतर बिझनेसमनने ऑफिस गाठत टॅब चोरीला गेला की नाही याची खात्री करुन घेतली. त्यानंतर बिझनेसमनच्या लक्षात आलं की, टॅब चोरीला गेला आहे. त्यानंतर चोरांनी परत फोन करत 12 लाखांची खंडणी मागितली. कारण चोरट्यांना त्या टॅबमध्ये बिझनेसमनचे जुन्या मैत्रिणीसोबत असलेले काही खासगी फोटो आणि व्हिडीओ सापडले होते. हे फोटो आणि व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देत त्यांनी खंडणीची रक्कम वाढवली.

दरम्यान बिझनेसमन या चोरांना खंडणी रक्कममधील 10 हजार देण्यासाठी गेलं असताना पोलिसांनी 4 जणांना पकडलं आहे. सातपूर पोलिसांनी संशयित आकाश बकरे, प्रकाश पानपाटील, सूरज गवई, श्रीपत शिंदे यांना अटक केली आहे. प्राथमिक चौकशीतच टॅबमध्ये दीडशे ते दोनशे व्हिडीओ असल्याचे समोर आले आहेत. या प्रकरणात तक्रारदारा बिझनेसमनवरही संशय व्यक्त करण्यात येत असून, मोठे सेक्स स्कँडल उघड होण्याची भीती पोलिसांनी व्यक्त केलीय.

## राज्यातील थेट शिक्षक भरतीची होणार चौकशी
## सरकार विशेष समिती स्थापन करणार

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

'पवित्र' प्रणालीद्वारे शिक्षक भरती करणे बंधनकारक असतानाही राज्यातील काही खासगी व अनुदानित शाळा प्रशासनांनी थेट भरती केली आहे. या शिक्षक भरतीवर कठोर कारवाई करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. पवित्र प्रणालद्वारे न झालेल्या शिक्षक भरतीची सखोल चौकशी करण्यात येणार आहे. या चौकशीसाठी विशेष समितीची स्थापना करण्यात येणार आहे. त्यामुळे राज्यभरातील अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या अनियमित भरतीवर आता टाच येणार आहे.

शिक्षक भरती पारदर्शक करण्यासाठी २२ जून २०१७ पासून 'पवित्र' या ऑनलाइन प्रणालीद्वारेच भरती करणे बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र, काही खासगी व अनुदानित शाळांनी विविध कारणे देत ही प्रणाली न वापरता थेट भरती केल्याच्या अनेकदा उघडकीस आले आहे. या पार्श्वभूमीवर, न्यायालयाने पवित्र पोर्टलशिवाय झालेल्या भरतींचा अहवाल तयार करण्याचे आदेश शासनाला दिले होते तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या दिरंगाईवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते.

समित्यांना हा अहवाल १५ मे २०२६ पर्यंत शासनाला सादर करणे बंधनकारक करण्यात आले असून, या प्रक्रियेवर शिक्षण संचालक आणि आयुक्त (शिक्षण) यांचे नियंत्रण राहणार आहे. यामुळे राज्यभरातील शिक्षक भरती प्रक्रियेचा एकत्रित आढावा सरकारला मिळणार आहे. शिक्षक भरती प्रक्रिया अधिक सक्षम, पारदर्शक आणि वेळेत पार पाडण्यासाठी शासनाने मानक कार्यपद्धती देखील निश्चित केली आहे. उमेदवार, संस्थाचालक आणि प्रशासन यांच्यात समन्वय वाढवण्यावर विशेष भर देण्यात आला आहे.

## 600 रुपयांच्या उधारीवरुन मजूर भिडले
## एकमेकांवर एसिडने हल्ला, 8 जण होरपळले

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईत मालाड उपनगरात एका विचित्र घटना घडली आहे. मालाड पूर्व स्थित प्रभाग क्रमांक 42, पालनगर भागात अनधिकृत प्लेटिंग कंपन्यात काम करणाऱ्या मजूरांमध्ये झालेल्या किरकोळ वादातून एकमेकांवर एसिडने हल्ला करण्याचा भयंकर प्रकार घडला आहे. या एसिड हल्ल्यात सहा ते सात पादचाऱ्यांनाही भाजल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. सहाशे रुपयांच्या उधारीवरुन हा वाद दोघा मजूरामध्ये झाल्याचे म्हटले जात आहे.




मालाड येथील पालनगर भागात अवैधपणे 100 ते 125 प्लेटिंग यूनिट्स स्थानीय नेते आणि प्रशासनाच्या कथित सहभागाने चालतात. यात धोकादायक एसिडचा सर्रासपणे वापर केला जात असतो. गुरुवारी कंपनीत काम करणाऱ्या मजुरांमध्ये सहाशे रुपयांच्या उधारीवरुन भांडणे सुरु झाली. जी पाहाता पाहाता मोठ्या हाणामारी पर्यंत पोहचली. यानंतर मजूरांनी एकमेकांवर एसिड फेकण्यास सुरुवात केली. हा भाग रस्त्याच्या कडेलाच असल्याने रस्त्याने जाणाऱ्या पादचाऱ्यांवरही हे एसिड उडाले. त्यामुळे आठ जण होरपळले गेले.

या एसिड हल्ल्यात संदीप सरोज नावाचा तरुण गंभीर जखमी झाल्याने त्याला माऊली हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. अन्य सात जखमींवर महानगर पालिकेच्या शताब्दी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या घटनेत सुदैवाने कोणाचे प्राण गेले नाहीत.

**पोलिसांच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह**
घटनेची माहिती कळताच कुरार पोलिसांनी घटनास्थळी येत परिस्थितीवर नियंत्रण आणले. पोलिसांनी समर बहादुर राजकुमार सिंह नावाच्या एका आरोपीला अटक केली आहे. पोलिस या प्रकरणाचा सखोल तपास करत आहे. या परिस्थितीवर नियंत्रण आणण्यासाठी येथे पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. पोलिसांनी या दोन्ही गटावर क्रॉस केस दाखल केली आहे. जे लोक या प्रकरणात रस्त्यावरुन जात होते. त्यांनाही आरोपी ठरवण्यात आले आहे. या प्रकरणात पोलिसांच्या तपासावर नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. स्थानिक लोकांच्या माहितीनुसार येथे अनेक अवैध कंपन्या चालवल्या जात आहेत. या कंपन्यात एसिड सारखे घातक केमिकल सर्रास वापरले जात आहे. यात स्थानिक गुंड आणि नेत्याच्या आशीर्वाद असल्याचे म्हटले जात आहे.

## अमरावतीत मित्राला बांधून त्याच्यासमोरच तरुणीवर 5 जणांकडून सामूहिक बलात्कार

■ **अमरावती। प्रतिनिधी,**

अमरावतीत तरुणीवर सामूहिक बलात्कार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आरोपींनी 18 वर्षीय महाविद्यालयीन तरुणी आणि तिच्या मित्राला आधी रस्त्यात अडवून मारहाण केली. यानंतर त्यांनी तरुणाला बांधून ठेवत, त्याच्यासमोर तरुणीवर सामूहिक बलात्कार केला. याप्रकरणी पोलिसांनी पाचही आरोपींना अटक केली आहे. 12 तासाच्या आता पोलिसांनी आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. फ्रेजरपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या भानखेडा जंगल परिसरात एका तरुणीवर सामूहिक अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. त्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मित्रासोबत दुचाकीने फिरायला गेलेल्या तरुणीला काही अज्ञात आरोपींनी जंगलात ओढून नेले व तिच्यावर अत्याचार केल्याची माहिती समोर आली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ तपास सुरू करून पाच जणांना अटक केली आहे.

**आरोपींनी काढला व्हिडीओ**

धक्कादायक बाब म्हणजे, आरोपींनी बलात्कार करताना व्हिडीओ शूट केला होता. घडलेला प्रकार कोणाला सांगितला तर हा व्हिडीओ व्हायरल करु अशी धमकी त्यांनी तरुणीला दिली होती.



**पोलिसांनी जंगल पिंजून काढलं, 12 तासात आरोपीला अटक**
पोलिसांनी तपासाची चक्रं वेगाने फिरवली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी मित्रासोबत मोपेडने परतत असताना पाच जणांनी त्यांना अडवलं. त्यांनी दोघांना ओढत जंगलात नेलं आणि पैशांसाठी मारहाण सुरु केली. पीडितेने तिच्याकडील 120 रुपये त्यांना दिले. मात्र यानंतर त्यांनी तिच्यावर बलात्कार केला. घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली पथकांनी रात्रभर जंगल पिंजून काढलं,. यानंतर रविवारी पहाटेपर्यंत पोलिसांनी पाचही आरोपींना अटक केली. याप्रकरणी सामूहिक बलात्कार आणि लुटण्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित तरुणीवर रुग्णालयात उपचार सुरू असून तिची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करत असून आरोपींवर कठोर कारवाई केली जाणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

## कल्याणमध्ये वृद्धावर जीवघेणा हल्ला... सीसीटीव्ही कॅमेऱ्यात घटना कैद

■ **कल्याण। प्रतिनिधी,**

कल्याण पूर्वेतील कोळसेवाडी परिसरात मालमत्ता वादातून वृद्धावर जीवघेणा हल्ला करण्यात आला असून ही संपूर्ण घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे. कल्याण पूर्वेतील नाना पावसे चौक, कोळसेवाडी परिसरात २४ मार्च रोजी दुपारी दरम्यान ही घटना घडली होती.



मिळालेल्या माहितीनुसार, विवेक सांगळे हे दुचाकीवरून घरी जात असताना निलेश दुबे या तरुणाने त्यांचा रस्ता अडवत वाद घातला. वाद वाढताच दुबे याने सांगळे यांना भररस्त्यात बेदम मारहाण केली.

विवेक सांगळे यांच्या म्हणण्यानुसार, प्रथम ठोसे मारून त्यांना गाडीवरून खाली पाडले. त्यानंतर लाकडी दांडक्याने त्यांच्या डाव्या कानाजवळ जोरदार फटका मारण्यात आला आणि छातीवर लाथा मारत हल्ला सुरूच ठेवला. या झटापटीदरम्यान सांगळे यांच्या गळ्यातील सोन्याची चेन तुटून हरवल्याचीही माहिती त्यांनी दिली आहे. जखमी अवस्थेत त्यांनी कोळसेवाडी पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.

दरम्यान, आरोपी निलेश दुबे यानेही सांगळे यांनी गाडी अंगावर घालून मारण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे पोलिसांनी दोन्ही बाजूंनी परस्पर गुन्हा दाखल करून या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे.

महत्त्वाचे म्हणजे, याआधीही दुर्गा माता मंदिराजवळील ओम सीता निवास म्हणून इमारत आहे आणि या इमारतीमध्ये सांगळे यांचे रेशनचे दुकान आहे आणि त्याच इमारतीमध्ये दुबे राहतात. त्या ठिकाणच्या जागेचा वाद हा गेले काही महिन्यापूर्वी झाला होता. त्यावेळी परप्रांतियाकडून मराठी माणसाची जागा हडपण्याचा आरोप करत मनसेने मोठा गोंधळ घातला होता. मात्र यानंतर पोलिसांनी गुन्हा नोंद केला होता.

## अपंगत्वाचा खोटा दावा, 8 शिक्षक निलंबित




■ **बीड। प्रतिनिधी,**

श्रवणदोषाचा (ऐकू येण्यास अडथळा) खोटा दावा करून सरकारी सवलतींचा लाभ घेतल्याच्या आरोपाखाली महाराष्ट्र राज्यातील बीड जिल्हा प्रशासनाने जिल्हा परिषदेच्या विविध प्राथमिक शाळांमधील आठ शिक्षकांना निलंबित केले आहे, अशी माहिती मंगळवारी अधिकाऱ्यांनी दिली.

'अली यावर जंग नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्पीच अँड हिअरिंग डिसेबिलिटीज' या प्रतिष्ठित राष्ट्रीय संस्थेद्वारे करण्यात आलेल्या सविस्तर वैद्यकीय पुनर्तपासणीनंतर ही कारवाई करण्यात आली. या तपासणीत असे दिसून आले की, संबंधित शिक्षकांचा श्रवणदोष हा 'बेंचमार्क' अपंगत्वासाठी (किमान आवश्यक टक्केवारी) आवश्यक असलेल्या निकषांपेक्षा खूपच कमी होता.

या अहवालाच्या आधारे, बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी या आठ शिक्षकांच्या तत्काळ निलंबनाचे आदेश दिले असून त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी सुरू करण्याचे निर्देश दिले.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, प्रमाणित अपंगत्व असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना थेट भरतीत आरक्षण, बदली आणि पदोन्नतीमध्ये प्राधान्य, अतिरिक्त प्रवास भत्ता, व्यवसाय कर माफी आणि आयकर सवलतींसह अनेक फायदे मिळतात. मात्र, काही शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या अपंगत्व प्रमाणपत्रांच्या ओळखपत्रांच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्या अनेक तक्रारी प्रशासनाकडे प्राप्त झाल्या होत्या.

मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी सांगितले की, "अपंगत्व लाभाचा दावा करणाऱ्या एकूण ३५ शिक्षकांना वैद्यकीय तपासणी करण्यास सांगण्यात आले होते. आतापर्यंत ८ शिक्षकांची प्रक्रिया पूर्ण झाली असून, त्या सर्वांची प्रमाणपत्रे अवैध आढळली आहेत. उर्वरित २७ शिक्षकांना वैद्यकीय फेरतपासणीच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पुढील अहवालानुसार त्यांच्यावरही कारवाई केली जाईल." यातील बहुतेक शिक्षक अंबाजोगाई तालुक्यातील असून काही केज, बीड आणि गेवराई तालुक्यातील आहेत.

## मित्रांसह भावाशी संबंध ठेवण्यास टाकला दबाव, व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी

### पीडितेनं सांगितला घटनेचा थरार

■ **नवी मुंबई। प्रतिनिधी,**

तरुणीला लग्नाचं आमिष दाखवून तिच्यासोबत एक दुर्दैवी घटना घडली. एवढंच नाहीतर तिच्यावर धर्म परिवर्तनास दबाव आणण्यात आला. तक्रारीनंतर पोलिसांनी आरोपी जनसेवा केंद्र मोहम्मद फराजला अटक केली. पीडितेनं या प्रकरणाबाबत जानकीपुरम ठाणे परिसरात तक्रार दाखल केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी आणि तरुणीची शाळेपासून ओळख होती. आरोपीने तरुणीशी अधिक जवळीकता वाढवली आणि आपल्या जाळ्यात ओढलं. 15 ऑक्टोबर 2025 रोजी मोहम्मद फराज तरुणीला जानकीपुरम येथील 60 फूटाच्या रोडवरील एका हॉटेलात घेऊन गेला, त्याने तिला गुंगीचं औषध देऊन तिच्यावर लैंगिक शोषण केलं.

**भावासह मित्रांशी संबंध ठेवण्यास दबाव टाकला**

यादरम्यान, आरोपीने एक व्हिडिओ देखील बनवल्याचे सांगण्यात येत आहे. संबंधित व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी दिली, नंतर तरुणीचे शोषण सुरुच ठेवले. आरोपीने तिच्यावर त्याच्या मित्रांशी आणि भावाशी संबंध ठेवण्याचा दबाव टाकण्यात आला होता, असा आरोप पीडितेनं केला.

**'धर्म स्वीकारला तर तिच्याशी विवाह करेन'**
पीडितेला आरोपीने तिला सांगितलं की, जर तिने धर्म स्वीकारला तर तो तिच्याशी विवाह करेल. तसेच, तिचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देखील दिली होती, नंतर तिचा मानसिक छळ केला होता. 22 मार्च रोजी त्याने संबंधित व्हिडिओ मुलीच्या वडिलांना आणि ओळखीच्या लोकांना पाठवला, नंतर त्याने स्क्रीनशॉट काढून ते डिलिट केले. पीडितेला धमकी दिली की, जर तिने पोलिसांना तक्रार दाखल केल्यास तिचे व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देऊन ठार मारले.

**आरोपी अटकेत**

जानकीपुरम पोलीस ठाण्याचे प्रभारी विनोद कुमार तिवारी यांनी सांगितलं की, गुरुवारी एफआरआय दाखल करण्यात आला. पोलिसांनी कारवाई करत शुक्रवारी सलीम तिराहजवळून आरोपी मोह म्मद फराजला अटक केली. सध्या पोलीस आरोपीची चौकशी करत असून संपूर्ण प्रकरणाचा तपास करत आहेत. या घटनेत आणखी कोणी सहभागी आहे का, याचा पोलीस तपास करत आहेत.

**काही तासांतच बाळ आणि तरुणीचा मृत्यू**
घटनेची माहिती मिळताच, कुटुंबीय घाबरले आणि त्यांनी तात्काळ त्या तरुणीला आणि नवजात बाळाला जवळच्या एका खाजगी रुग्णालयात दाखल केले. प्रथमोपचार दिल्यानंतर, तिची प्रकृती गंभीर असल्याने डॉक्टरांनी तिला ससून रुग्णालयात पाठवले. दरम्यान, नवजात बाळाची प्रकृतीही गंभीर होती. चांगल्या उपचारांसाठी त्याला यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी दोघांनाही वाचवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले, परंतु काही तासांतच, आधी बाळ आणि नंतर त्या तरुणीचा मृत्यू झाला.



## 22 वर्षीय अविवाहित तरुणीला गेलेले दिवस, कुटुंबापासून लपवलेला गर्भ... 'त्या' गोळ्या खाल्ल्या अन् काही तासातच...

■ **पुणे। प्रतिनिधी,**

पुणे शहरातून एक धक्कादायक आणि हृदयद्रावक घटना समोर आली आहे. एका 22 वर्षीय अविवाहित तरुणीने गर्भवती असल्याचं कुटुंबापासून लपवलं होतं. घरी झालेल्या अनपेक्षित प्रसूतीनंतर, उपचारादरम्यान अतिरक्तस्रावामुळे तिचा आणि तिच्या नवजात बाळाचा मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे.

**गर्भधारणेच्या सातव्या महिन्यात गर्भधारणा**

पोलिसांच्या माहितीनुसार, ती तरुणी अंदाजे सात महिन्यांची गर्भवती होती, परंतु तिने ही गोष्ट आपल्या कुटुंबापासून गुप्त ठेवली होती. मात्र, मंगळवार, 24 मार्च रोजी सकाळी तिने गर्भपाताच्या गोळ्या घेतल्या. त्यानंतर थोड्याच वेळात ती शौचालयात गेली, जिथे तिला तीव्र वेदना आणि अतिरक्तस्रावाचा त्रास जाणवला. तिने घरीच बाळाला जन्म दिला.

**तरुणीचा मोबाईल फोन फॉरमॅट**

या प्रकरणात आणखी एक धक्कादायक घडामोड समोर आली आहे. मृत तरुणीचा मोबाइल फोन फॉरमॅट झाल्याचे समजले असून, त्यामुळे अनेक संशय निर्माण झाले आहेत. ती गर्भवती का होती, तिला औषधे कुठून मिळाली आणि या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग होता का, याचा तपास पोलीस करत आहेत.

**आणखी खुलासे होण्याची शक्यता**

मृत तरुणी मध्यमवर्गीय कुटुंबातील होती आणि खाजगी नोकरी करत होती. ती गेल्या महिनाभरापासून घरीच होती. तिच्या कुटुंबात तिची आई, भाऊ आणि बहिणी आहेत. या घटनेमुळे कुटुंबावर अतोनात दुःखाचा डोंगर कोसळला आहे. चिंचवड पोलीस सध्या या प्रकरणाचा गांभीर्याने तपास करत असून, पुढील खुलासे होण्याची शक्यता आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com